CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २९४ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### धावपटू पी.टी. उषा यांच्या पतीचे निधन

**नवी दिल्ली :** प्रसिद्ध धावपटू पी. टी. उषा यांच्या पतीचे निधन झाले आहे. पी. टी. उषा यांचे पती व्ही. श्रीनिवासन यांनी वयाच्या ६७ व्या वर्षी अखेरचा श्र्वास घेतला. व्ही. श्रीनिवासन आज (शुक्रवार, ३० जानेवारी) सकाळी आपल्या राहत्या घरी बेशुद्ध पडले. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र उपचारदरम्यान त्यांचे निधन झाले.

व्ही. श्रीनिवासन यांच्या निधनाची बातमी समजताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधान मोदी यांनी राज्यसभा खासदार आणि भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांच्याशी संवाद साधला आणि त्यांचे पती व्ही. श्रीनिवासन यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. व्ही. श्रीनिवासन हे केंद्र सरकारमधील माजी कर्मचारी होते. ते केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात अर्थात उखडऋ मधून उपअधीक्षक म्हणून निवृत्त झाले होते. १९९१ मध्ये पी.टी. उषा आणि श्रीनिवासन यांचं लग्न झालं होतं. लग्नानंतर श्रीनिवासन यांनी कायमच पी. टी. उषा यांना त्यांच्या खे-ळात, तसंच राजकीय करिअरमध्येही मोलाची साथ दिली.

### आयुष मंत्रालयाचा झेप्टोसोबत करार

**नवी दिल्ली :** देशातील सर्वसामान्य नागरिकांना आयुष औषधं आणि वेलनेस औषधं सहज उपलब्ध व्हावी यासाठी आयुष मंत्रालयाने झेप्टो या क्विक-कॉमर्स कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे. या उपक्रमामुळे पारंपरिक उपचारपद्धतींची उत्पादने ऑनलाइन माध्यमातून अधिक व्यापक पातळीवर पोहो-चणार असून गुणवत्ता आणि नियमपालन यांना प्राधान्य दिले जाणार आहे. या करारानुसार आयुष मंत्रालयाच्या निर्यात प्रोत्सा-हन परिषदेच्या मदतीने झेप्टोच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर आयुष औषधे आणि आरोग्यवर्धक उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असतील. झेप्टो कमी वेळेत वस्तू घरपोच पोहोचवते, त्यामुळे गरज असताना लोकांना औषधे लवकर मिळू शकतील. याबद्दल व्हिडिओ मेसेजिंगद्वारे बोलताना केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले की, तंत्रज्ञानावर आधारित स्टार्टअप्समुळे विश्र्वासार्ह आरोग्य उत्पादने थेट लोकांपर्यंत पोहोचवणे शक्य झाले आहे. झेप्टोसारख्या डिजिटल डिलिव्हरी प्लॅटफॉर्ममुळे भारताची जुनी आयुष परंपरा आधुनिक आणि पारदर्शक वितरण व्यवस्थेशी जोडली जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

### पंतप्रधान मोदी यांनी घेतला विकासाचा आढावा

**नवी दिल्ली :** जरी सध्या देशाचे लक्ष अर्थसंकल्पाकडे केंद्रित असले तरी, या सरकारची ओळख नेहमीच रिफॉर्म, परफॉर्म आणि ट्रान्सफॉर्म अशी राहिली आहे. देश आता 'रिफॉर्म एक्सप्रेस'वर वेगाने पुढे जात असून, संसद सदस्यांच्या सकारात्मक सहकार्यामुळे सुधारणा अधिक गतीने राबवल्या जात आहेत. सरकारने लास्ट-माईल डिलिव्हरीवर विशेष लक्ष केंद्रित केले असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले. योजना केवळ कागदांवर न राहता थेट नागरिकांच्या जीवनात पोहोचाव्यात, हा सरकारचा प्रयत्न आहे. आगामी काळात नेक्स्ट जनर-ेशन रिफॉर्म्सच्या माध्यमातून ही सुधारणा प्रक्रिया अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यात येईल, असा विश्र्वासही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. संसदचे अर्थसंकल्पीय अधिवेशन गुरुवारपासून सुरू झाले आहे. या अधिवेशनात अनेक महत्त्वाची विधेयके, मोठे आर्थिक निर्णय तसेच सरकार आणि विरोधकांमधील तीव्र चर्चा पाहायला मिळणार आहे. १ फेब्रुवारी रोजी सादर होणारा केंद्रीय अर्थसंकल्प आणि संसदेत मांडले जाण-ारे आर्थिक सर्वेक्षण २०२६-२७ यामुळे हे अधिवेशन अधिकच महत्त्वाचे ठरले आहे.

### शांतीलाल सुरतवाला यांचे निधन

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अजितदादा यांच्यानंतर आपल्या अजून एका मोठ्या नेत्याला गमावले आहे. पुण्याचे माजी महापौर शांतीलाल सुरतवाला यांचे निधन झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार पुणे शहराचे माजी महापौर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शांतीलाल सुरतवाला यांचे शुक्रवारी (३० जानेवारी) पहाटेच्या सुमारास दुःखद निधन झाले. शांतीलाल सुरतवाला यांनी वयाच्या ७६ व्या वर्षी अखेरचा श्र्वास घेतला. गेल्या काही काळापासून ते कॅन्सर या गंभीर आज-ाराशी लढत होते. पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे उपचारादरम्यान त्यांनी आपले प्राण सोडले. शांतीलाल सुरतवाला यांनी १९९२ ते १९९३ या कालावधीत पुण्याचे महापौरपद भूषवले. शांतीलाल सुरतवाला हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू हकारी मानले जात होते.

# उद्या देशाचा अर्थसंकल्प!

## काय स्वस्त, काय महाग? बजेट मध्ये यंदा काय खास?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशाच्या आर्थिक प्रगतीचा लेखाजोखा मांडणारा 'केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७' येत्या रविवारी, १ फेब्रुवारी रोजी सादर होणार आहे. २९ जानेव-ारी रोजी संसदेत आर्थिक सर्वे क्षण सादर झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या भाषणाकडे लागले आहे. रविवारी सकाळी ११ वाजता अर्थमंत्री संसदेत बजेट मांडतील. हे बजेट अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करून नवा विक्रम प्रस्थापित करणार आहेत. मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा दु-सरा अर्थसंकल्प असून, आगामी वर्षात सरकारची आर्थिक धोरणे नेमकी कोणत्या दिशेने जाणार, याचा स्पष्ट आराखडा यातून समोर येईल.




भारतीय संसदीय लोकशाहीत यंदा एक आगळीवेगळी घटना पाहायला मिळणार आहे. साधारणपणे आठवड्यातील कामकाजाच्या दिवशी सादर होणारा केंद्रीय अर्थसंकल्प यंदा चक्क रविवारी (१ फेब्रुवारी) मांडला जाणार आहे. भारताच्या इतिहासात असे पहिल्यांदाच घडत असून, सकाळी ११ वाजता अर्थमंत्री निर्मला सीतारमण आपल्या भाषणाला सुरुवात करतील. २०१७ पर्यंत अर्थसंकल्प फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशी मांडला जात असे. मात्र, तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांनी ही परंपरा बदलून १ फेब्रुवारी ही तारीख निश्र्चित केली होती. आता २०२६ मध्ये रविवारी बजेट सादर करून नवा पायंडा पडत आहे. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि सामान्य नागरिकांच्या या अर्थसंकल्पाकडून मोठ्या अपेक्षा आहेत, त्यामुळे सुट्टीच्या दिवशी सादर होणाऱ्या या बजेटकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने २८ जानेव-ारी २०२६ रोजी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला दिमाखात सुरुवात झाली आहे. यंदाचे हे महत्त्वाचे अधिवेशन दोन टप्प्यांत पार पडणार असून, यामध्ये केंद्र सरकारच्या विविध धोरणांवर सविस्तर चर्चा होणार आहे. अधिवेशनाचा पहिला टप्पा २८ जानेवारीप-ासून सुरू झाला असून तो १३ फेब्रुवारीपर्यंत चालेल. त्यानंतर मंत्रालयांच्या खर्चाच्या मागण्या आणि अर्थसंकल्पीय घोषणांवर संसदीय समित्यांना सविस्तर अभ्यास करता यावा, यासाठी एक मोठा 'ब्रेक' दिला जाण-ार आहे. या अभ्यासानंतर अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्च रोजी सुरू होईल आणि २ एप्रिल २०२६ रोजी अधिवेशनाची सांगता होईल. या वेळापत्रकामुळे सरकारी योजनांच्या अंमलबजावणीवर सखोल चर्चा होण्यास मदत होणार आहे.

## सुनेत्रा पवार यांच्या रूपाने राज्याला मिळणार पहिली महिला उपमुख्यमंत्री ?

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ३० जानेवारी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील आकस्मिक निधनामुळे राज्याच्या मंत्रिमंडळात मोठी प्रशासकीय आणि राजकीय पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्याकडे असलेले महत्त्वाचे अर्थमंत्रालय आणि उपमुख्यमंत्रिपद आता कोणाकडे जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि छगन भुजबळ यांनी तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर सुनेत्रा पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याच्या हालचालींना वेग आला आहे. छगन भुजबळ यांनी यासंदर्भात मोठा दावा केला असून, उद्याच राष्ट्रवादीच्या आमदारांची मुंबईत निर्णायक बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत विधिमंडळ नेत्याची निवड झाल्यानंतर तातडीने राजभवनावर शपथविधी पार पडण्याची शक्यता आहे. पक्षातील आमदारांचा कल हा सुनेत्रा पवार यांच्याच बाजूने असून, अजितदादांचा राजकीय वारसा समर्थपणे चालवण्यासाठी त्यांच्या नावावर एकमत होण्याची चिन्हे आहेत. उद्याचा दिवस राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि सत्तेच्या समीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

अजितदादांच्या जाण्याने पक्षात आणि सरकारमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे, हे सत्य आहे. पण 'शो मस्ट गो ऑन' या उक्तीप्रमाणे आपल्याला पुढे जा-वेच लागेल. कोणाला तरी ही जबाबदारी स्वीकारावी लागेल, असे म्हणत भुजबळांनी पक्षाचे आणि सरकारचे कामकाज थांबणार नसल्याचे स्पष्ट केले. कार्यकर्त्यांच्या भावनांबद्दल बोलताना भुजबळ म्हणाले की, सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळावी, अशी पक्षात मोठी लाट आहे आणि ही मागणी मुळीच चुकीची नाही. अजितदादांच्या अनुपस्थितीत सु-नेत्रा पवारांच्या रूपाने हे महत्त्वाचे पद भरता येईल, याकडे सध्या पक्षाचे लक्ष केंद्रित आहे. पक्षाचे अध्यक्षपद आणि विधिमंडळ नेतेपद कोणाकडे द्यायचे, याचा अंतिम निर्णय घेण्यासाठी शनिवारी मुंबईत सर्व आमदारांची महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत जे ठरेल, त्यानुसार सत्तेचा पुढील गाडा हाकला जाईल, असे संकेत भुजबळांनी दिले आहेत.



### सुनेत्रा पवार आणि मुलांशी चर्चा करूनच उपमुख्यमंत्रिपदावर होणार शिक्कामोर्तब : सुनील तटकरे

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्याच्या राजकारणात आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. या पार्श्र्वभूमीवर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, प्रफुल पटेल आणि छगन भुजबळ यांच्यासह पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर 'अजितदादांचा उत्तराधिकारी कोण?' आणि 'उपमुख्यमंत्रिपद कोणाकडे जाणार?' या चर्चांना उधाण आले असतानाच सुनील तटकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय: सरकारी विमानांच्या देखभालीचा 'प्लॅन' तयार; 'जीआर' मध्ये काय?

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ३० जानेवारी :** महाराष्ट्र सरकारने राज्यातील सरकारी विमानांच्या आणि हेलिकॉप्टर्सच्या तातडीच्या कामांसाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. सरकारी हवाई वाहनांची देखभाल आणि दुरुस्ती वेळेत व्हावी, या उद्देशाने ६ कोटी रुपयांच्या खर्चाला वित्त विभागाने हिरवा कंदिल दाखवला आहे. डिसेंबर २०२५ मध्ये मांडण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये या निधीची तरतूद करण्यात आली होती. यामध्ये प्रत्येकी ३ कोटींच्या दोन स्वतंत्र मागण्यांचा समावेश होता. वित्त विभागाच्या व्यय अग्रक्रम समितीने या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून 'लहान बांधकामे' आणि 'यंत्रसामुग्री व साधनसामुग्री' या तांत्रिक गरजांसाठी हा निधी मंजूर केला आहे. यामुळे आता सरकारी हवाई ताफ्यातील वाहनांच्या अत्यावश्यक कामांना वेग मिळणार आहे.



राज्य शासनाच्या ताफ्यातील विमानांच्या आणि हेलिकॉप्टर्सच्या तातडीच्या देखभालीसाठी मंजूर करण्यात आलेला ६ कोटी रुपयांचा निधी आता प्रत्यक्ष वितरीत केला जाणार आहे. डिसेंबर २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात मंजूर झालेल्या या प्रस्तावावर वित्त विभागाने अंतिम शिक्कामोर्तब केले असून, हा निधी 'बीम्स' (इए-चड) प्रणालीवर उपलब्ध करून देण्यास सहमती दर्शविली आहे. शासकीय हवाई वाहनांच्या सुरक्षेच्या आणि तांत्रिक कामांच्या दृष्टीने हा प्रस्ताव अत्यंत महत्त्वाचा होता. यामध्ये प्रामुख्याने दोन तांत्रिक विभागांसाठी निधीची विभागणी करण्यात आली आहे. १. लहान बांधकामे: हवाई वाहनांशी संबंधित किरकोळ बांधकामे व दुरुस्तीसाठी ३ कोटी रुपये. २. यंत्रसामुग्री व साधनसामुग्री: विमानांचे सुटे भाग आणि अत्यावश्यक यंत्रणेसाठी ३ कोटी रुपये. लेखाशीर्ष क्रमांक २०७० ०१५६ अंतर्गत हा खर्च 'अनिवार्य' श्रेणीत ठेवण्यात आला होता. व्यय अग्रक्रम समितीने या खर्चाला आधीच मान्यता दिली होती, त्यानंतर हिवाळी अधिवेशनात विधीमंडळानेही यावर मोहोर उमटवली. आता वित्त विभागाने हा निधी प्रणालीवर वितरीत करण्यास परवानगी दिल्याने, प्रलंबित कामे तातडीने पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## अजित पवारांच्या अस्थीचं कऱ्हा नदी पात्रात विसर्जन

**तभा वृत्तसेवा**

**बारामती, दि. ३० जानेवारी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी विमान दुर्घटनेत निधन झाले.बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात आले.आज बारामतीतील कऱ्हा नदीपात्रात दादांच्या अस्थीचं विसर्जन करण्यात आलं. अस्थि विसर्जनासाठी संपूर्ण पवार कुटुंब कऱ्हा नदीच्या संगमावर उपस्थित होतं. दादांच्या निधनाने पवार कुटुंबियांवरच नव्हे तर महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे.

## अर्धापूर येथे शासकीय वाहनाचा अपघात; तहसीलदारांसह कर्मचारी जखमी



**तभा वृतसेवा**

**अर्धापूर, दि. २९ जानेवारी :** शहरातील मुख्य मार्गावर ट्रॅक्टर आणि तहसीलदार यांच्या शासकीय वाहनाचा अपघात झाल्याची घटना आज घडली. या अपघातात तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांच्यासह त्यांचे कर्मचारी जखमी झाले असून, सेवक शेख सलीम यांचा पाय फॅक्चर झाला आहे. त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालय अर्धापूर येथे उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रस्त्यावरून ट्रॅक्टर जात असताना समोर अचानक एक दुचाकी आली. या दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात ट्रॅक्टर चालकाने अचानक वळण घेतले. यावेळी ट्रॅक्टरचा दुभाजकाला धक्का लागल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि ट्रॅक्टर विरुद्ध दिशेला आला. त्याच वेळी समोरून तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांचे शासकीय वाहन येत होते. ट्रॅक्टर व तहसीलदारांच्या वाहनाची जोरदार धडक बसली. या अपघाताच्या वेळी गाडीमध्ये तहसीलदार रेणुकादास देवणीकर, चालक अरुण वाघमारे आणि सेवक शेख सलीम हे प्रवास करत होते.

अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. डॉ.आनंद शिंदे, सापोनी विष्णुपंत कराळे, संतोष काळे, विजय आडे,गजानन भालेराव,चंद्रकांत फुलकुंडवार, संभाजी गोहरकर, महादेव डुकरे, शेख फेरोज, उपस्थित सर्वांनी तत्काळ मदत कार्य राबवत जखमींना बाहेर काढले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. जखमींना तातडीने उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय अर्धापूर येथे दाखल करण्यात आले आहे. सुदैवाने, या अपघातात मोठी जीवितहानी टळली असली तरी वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.



## थोडक्यात...

### क्रॉम्प्टनने भारताला जागतिक स्तरावर नेले

**छत्रपती संभाजीनगर:** क्रॉम्प्टन या भारतातील सर्वात प्रतिष्ठित ग्राहक ब्रँडला जागतिक आघाडीची स्वतंत्र बाजारपेठ संशोधन कंपनी युरोमॉनिटर इंटरनॅशनलने जगातील पहिल्या क्रमांकाचा सिलिंग फॅन ब्रँड म्हणून सन्मानित केले आहे. युरोमॉनिटर इंटरनॅशनल लिमिटेडकडून मिळालेल्या या मान्यतेसह क्रॉम्प्टन भारतातील प्रतिष्ठित ब्रँड्सच्या निवडक समूहामध्ये सामील झाला आहे, जे जागतिक स्तरावर आघाडीवर आहेत आणि मायदेशासह आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये देखील मापदंड स्थापित करत आहेत.

### अधिक स्मार्ट आणि सुरक्षित डिजिटल बँकिंग सेवा

**पुणे:** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने आज अपग्रेडेड मोबाइल बँकिंग आणि इंटरनेट बँकिंग प्रणाली, 'उज्जीवन ईझी' लाँच करण्याची घोषणा केली आहे. 'डिजिटल-फर्स्ट' धोरणाला बळकटी देण्याच्या दिशेने बँकेचे हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आपल्या रिटेल ग्राहकांचा विचार करून तयार केलेले, उज्जीवनची हे 'ईझी' मोबाईल आणि वेब या दोन्ही माध्यमांवर एकसंध, सुरक्षित आणि वापरण्यासाठी सोपा बँकिंग अनुभव देते. महत्त्वाचे म्हणजे ते इंग्रजी, हिंदी, कन्नड, गुजराती, मराठी, बंगाली, ओडिया, पंजाबी आणि तमिळ या नऊ भाषांमध्ये उपलब्ध आहे.

### हॉर्टीकनेक्ट इंडिया एक्सपो २०२६ ची बेंगळुरूमध्ये पुनरागमन

**पुणे:** हॉर्टीकनेक्ट इंडिया एक्सपोची २०२६ आवृत्ती १ ते ३ ऑक्टोबरदरम्यान बेंगळुरु इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित केली जाणार आहे. यंदा हा एक्सपो अधिक व्यापक स्वरूपात सादर होणार असून, भारताच्या मोठ्या कृषी क्षेत्राशी अधिक थेट जोड निर्माण करण्याच्या दिशेने पावले उचलत आहे. या ट्रेड फेअरचे सह-आयोजन मेस्से म्युएनचेन इंडिया आणि बेंगळुरुस्थित हॉर्टीकनेक्ट ग्लोबल प्रा. लि. यांच्या भागीदारीत केले जाणार आहे.

### क्राफ्टन इंडिया २०२६ साठी रायझिंग स्टार्स प्रोग्राम परत

**पुणे** – पहिल्या वर्षात प्रत्यक्ष प्रभाव आणि आकर्षक वाढीची यशोगाथा नोंदवल्यानंतर, क्राफ्टन इंडिया ने आज क्राफ्टन इंडिया ईस्पोर्ट्स रायझिंग स्टार्स प्रोग्राम २०२६ साठी नोंदणी सुरू करण्याची घोषणा केली आहे. हा कार्यक्रम देशभरातील तळागाळातील ईस्पोर्ट्स टैलेंट वाढवण्यासाठी कंपनीच्या दीर्घकालीन प्रतिवद्धतेला बळकटी देतो. दुसऱ्या कोहोर्टसाठी नोंदणी २० जानेवारी २०२६ पासून २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत खुली राहील. निवडलेले रायझिंग स्टार्स नोंदणी कालावधी संपल्यानंतर बीजीआयएस २०२६ दरम्यान क्राफ्टन इंडिया च्या ऑफिशियल सोशल मीडिया चॅनेल्सवर जाहीर केले जातील आणि वर्षाच्या उर्वरित भागात ऑनबोर्ड केले जातील.

### क्युरेटेड टेक पॅकेज सादर

**छत्रपती संभाजीनगर:** टोयोटा किर्लोस्कर मोटर ने आपल्या लोकप्रिय एसयूव्ही अर्बन क्रूझर हायरायडर साठी एक क्युरेटेड टेक पॅकेज सादर केले आहे. दैनंदिन ड्रायव्हिंग अधिक आरामदायी, सोयीस्कर आणि सुरक्षित बनवण्याच्या उद्देशाने डिझाइन करण्यात आलेले हे पॅकेज स्मार्ट व सहज वापरता येणाऱ्या तंत्रज्ञान सुविधांनी सुसज्ज असून प्रत्येक प्रवास अधिक कनेक्टेड, सुरक्षित आणि प्रीमियम बनवते.

### 'लाईफ इज हार्ड. स्विच टू सॉफ्टर'

**मुंबई:** पिरामल फार्मा लिमिटेडचा विभाग असलेल्या पिरामल कन्झ्युमर हेल्थकेअर (पीसीएच) ने आपल्या बेबी केअर ब्रँड लिटल्स साठी 'लाईफ इज हार्ड. स्विच टू सॉफ्टर' ही नवी डिजिटल जाहिरात मोहीम सादर केली आहे. या मोहिमेत कथेच्या केंद्रस्थानी थेट बाळाला ठेवण्यात आले आहे. ज्या क्षेत्रात बहुतांश संवाद पालकांशी टिप्स, मार्गदर्शन आणि चेकलिस्ट्सद्वारे साधला जातो, त्या ठिकाणी लिटल्स बाळाच्या अनुभवाकडे लक्ष वळवते. हा असा आवाज, अनुभव अनेकदा ऐकला जात नाही. ही कथा एका रोजच्या सत्यावर आधारित आहे. बाळ अनेकदा ते व्यक्त करू शकत नाहीत अशा अस्वस्थतेचा शांतपणे सामना करत असतात.

### खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धा २०२६

**पुणे :** खेलो इंडिया विंटर गेम्स २०२६ च्या उपांत्य फेरीत यजमान लडाखला ३-२ ने पराभूत करून चंदीगडचा पुरुष आइस-हॉकी संघ चर्चेचा विषय ठरला. प्रजासत्ताक दिनी एनडीएस स्टेडियमवर पार पडलेल्या पुरुष गटाच्या आइस-हॉकी फायनलमध्ये, अनुभवी भारतीय सैन्यदलाला आपले सुवर्णपदक टिकवण्यासाठी चंदीगडच्या जिद्दी संघाविरुद्ध आपला पूर्ण अनुभव पणाला लावावा लागला. सैन्यदलाने हा सामना ३-२ असा फरकाने जिंकला. सामन्याची शेवटची ३ मिनिटे शिल्लक असताना सैन्यदलाने विजयी गोल डागला.

# मराठी चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याचे आव्हान असले तरी भविष्य आशादायी

## मराठी चित्रपटांचा बदलता चेहरा विषयावरील परिसंवाद






**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३० जानेवारी :** मराठी सिनेमा आशयाच्या पातळीवर अधिक प्रामाणिक, वैविध्यपूर्ण आणि सामाजिक जाणिवांनी समृद्ध होत आहे. मात्र, हे आपले मराठी चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वितरण व्यवस्था, चित्रपटगृहांची संख्या आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असून भविष्यकाळ आशादायक असल्याचा सूर आज झालेल्या 'मराठी चित्रपटाचा बदलता चेहरा' या परिसंवादात मान्यवरांनी काढला.

अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी 'मराठी चित्रपटांचा बदलता चेहरा' या विषयावर आयोजित परिसंवादात मराठी सिनेमाच्या आशय, मांडणी, निर्मिती प्रक्रिया आणि प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याच्या आव्हानांवर सखोल चर्चा झाली. या परिसंवादात 'साबरबोंड'चे दिग्दर्शक रोहन कानवडे, 'आत्मपॅम्फ्लेट'चे दिग्दर्शक आशिष बेंडे आणि निर्माती तन्मयी देव सहभागी झाले होते. या परिसंवादाच्या संवादिका म्हणून नम्रता फलके यांनी काम पाहिले. यावेळी एमजीएम कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडियाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या एमजीएम इन्सपायर या अंकाचे महोत्सव संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

परिसंवादात बोलताना दिग्दर्शक आशिष बेंडे म्हणाले, माझ्या अनुभवविश्वातील कथा मी लिहिल्या असून बालपणी कंडक्टर, रेल्वेचालक आणि सैन्यात जाण्याची स्वप्ने पाहत मी मोठा झालो. मला माझ्या वडिलांनी चित्रपटांची आवड लावली. शालेय नाटकांतून मिळालेल्या प्रोत्साहनामुळे अभिनयाकडे वळलो; मात्र पुढे अभिनयापेक्षा मला दिग्दर्शन अधिक जवळचे वाटल्याने मी दिग्दर्शनाकडे वळलो. कथा सांगताना तटस्थपणे पाहून ती कोणत्या माध्यमात योग्य ठरेल, हे ठरवणे आवश्यक आहे. प्रत्येक गोष्ट आपापली शैली घेऊन येत असते. आज प्रेक्षकांपर्यंत सिनेमा पोहोचविण्याची गरज असून मराठवाड्यात मराठी सिनेमा पाहण्याची भूक आहे; मात्र पुरेशी चित्रपटगृहे आहेत का, हा प्रश्न आहे.

दिग्दर्शक रोहन कानवडे यांनी 'साबरबोंड' या चित्रपटाला जगभरातील प्रेक्षकांकडून मिळालेल्या प्रतिक्रियांना समृद्ध करणारा अनुभव असल्याचे सांगितले. लहानपणापासून सिनेमा करायचे ठरवले नव्हते. चित्रपट पाहताना हळूहळू आवड निर्माण झाली. शालेय अभ्यासक्रमातील 'स्मशानातील सोनं' हा धडा वाचून मला लिखाणाची आवड निर्माण झाली. २००७ साली मित्राचा मोबाईल वापरून पहिली शॉर्ट फिल्म बनवली तेथून माझा प्रवास सुरू झाला. मी कोणता संदेश द्यायचा म्हणून चित्रपट बनवत नसून त्यातून काय घ्यायचे हे प्रेक्षक ठरवत असतात. वैयक्तिक आयुष्यातील अनुभव, नातेसंबंध, लैंगिक ओळख याविषयी प्रामाणिकपणे मांडणी केली तर कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचते, हा माझा अनुभव आहे.

निर्माती तन्मयी देव यावेळी बोलताना म्हणाल्या, कोणताही चित्रपट ठरवून तयार होत नाही. सुरुवातीचे काही दिवस कल्पना, कथा आणि दिग्दर्शकाच्या दृष्टिकोनावर अवलंबून असतात. निर्मात्याकडे केवळ आर्थिक क्षमता नव्हे तर सर्जनशील समजही असणे आवश्यक आहे. दिग्दर्शकाची दृष्टी, कथा आणि क्रिएटिव्हिटीला पाठबळ देणे हे निर्मात्याचे महत्त्वाचे काम असते.

## सर्कल प्रचार कार्यालयाचे मंत्री सावे यांच्या हस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ३० जानेवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रचाराची रणधुमाळ सुरू आहे, बिडकीन जिल्हा परिषद सर्कल भारतीय जनता पक्षाचे जिल्हा परिषद उमेदवार विजय अंबादास चव्हाण व पंचायत समिती उमेदवार उमेश गुजर व निलजगाव पंचायत समिती उमेदवार आरती राठोड यांच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे आज दि ३० रोजी महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे.याप्रसंगी माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार भागवत कराड, बिडकीण जिल्हा परिषद विवेक देशपांडे, शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी त्यांनी कमळ या निशाणीला बहुमताने विजयी करा असे भाषणात सांगितले. बिडकीन डीएमआयसी मध्ये स्थानिक बेरोजगारांना नोकरी रोजगार मिळण्यासाठी आमचे सरकार शंभर टक्के प्रयत्न करणार आहे. भारतीय जनता पार्टी पक्षाच्या कमळ या निशाणीला बहुमताने विजयी करून आपले उमेदवार विजय चव्हाण, उमेश गुजर, आरती राठोड यांना प्रचंड मताने विजयी करा.

शिवसेनेने ऐनवेळी युती तोडून घात केला असून बिडकीन ही पैठण तालुक्यातील एकमेव जागा आपली असून असा निर्णय झाला असता शिवसेनेला बिडकीन जागा नसल्याने त्यांनी युती तोडून त्यांनी भाजप विरोधात उमेदवार उभा केला. यावेळी शिवसेनेचे सरपंच अशोक धर्मे, उपसरपंच किरण गुजर,ग्रामपंचायत सदस्य सागर फर्ताळे, मोहन हिवाळे,लाखेगावचे माजी सरपंच ज्ञानेश्र्वर रहाटवाडे, माजी सरपंच लक्ष्मण रहाटवाडे शेकटाचे सरपंच विष्णू भवर, अर्जुन भवर, नितीन भवर,नारायण भवर, योगेश भवर, सविता राऊत संदिप गायकवाड या यांच्यासह अनेक शिंदेसेनेच्या व उभाठा गटाच्या शिवसैनिकांनी भाजप मधे जाहीर प्रवेश केला. यावेळी भाजपाचे गणेश काळे, अजय राठोड, अविनाश राठोड, विजय शेळके, गणेश दाणे, बाबासाहेब धर्मे, निलेश धडे, निलेश गुजर, ऋषिकेश खंडागळे, अण्णासाहेब भवर, पांडुरंग खंडागळे, कुंडलिक दाभाडे, प्रणव भवर, आकाश भवर, सुमित रुपेकर यांची उपस्थिती होती.

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची बिडकीन येथे जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ३० जानेवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने बिडकीन सर्कल मधील भारतीय जनता पार्टीचे उमेदवार विजयी चव्हाण,व पंचायत समिती बिडकीन उमेदवार उमेश गुजर व निलजगाव पंचायत समिती उमेदवार आरती राठोड यांच्या प्रचारासाठी सभा घेण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सायंकाळी पाच वाजता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दि ३१ जानेवारी रोजी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे तरी बिडकीन सर्कल व परिसरामधील नागरिकांनी भाजप पदाधिकारी कार्यकर्ते महिला आघाडी यांनी सभेसाठी उपस्थित राहावे असे आव्हान उमेदवार विजय चव्हाण यांनी केले आहे.

## पोलिसांनी ड्रग्ज पेडलर्सचे जाळ फोडलं

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३० जानेवारी :** शहराला अमली पदार्थांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी गुन्हे शाखेने आता कंबर कसली आहे. गेल्या पाच दिवसांपासून शहरात सुरू असलेल्या धडाकेबाज मोहिमेमुळे ड्रग्ज माफियांचे धाबे दणाणले आहेत. मुंबई आणि गुजरात या मार्गावरून शहरात मोठ्या प्रमाणावर एमडी पावडरसारख्या महागड्या अमली पदार्थांची तस्करी होत असल्याचे समोर आल्यानंतर, पोलिसांनी अवघ्या पाच दिवसांत २० पेडलर्सचे जाळे पूर्णपणे फोडलं आहे. या संपूर्ण कारवाईत एका प्लंबरचे नाव समोर आल्याने पोलीस प्रशासनासह सर्वच थक्क झाले आहेत.

## बालविकास व प्रौढ मानसिक आरोग्यासाठी मोफत सल्ला व जनजागृती अभियान



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३० जानेवारी :** वाढत्या तणावपूर्ण जीवनशैलीमुळे मुलं, किशोरवयीन व प्रौढांमध्ये मानसिक, भावनिक तसेच विकासात्मक समस्यांचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्र्वभूमीवर मराठवाड्यातील पहिले सर्वसमावेशक शाश्र्वत सेंटर फॉर चाइल्ड डेव्हलपमेंट अँड मेंटल वेलनेस कार्यान्वित झाले असून उद्घाटनानिमित्त एक महिन्याचे मोफत सल्ला व जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. एकाच छताखाली मल्टिडिसिप्लिनरी पद्धतीने सेवा देणे हे केंद्राचे वैशिष्ट्य आहे.

केंद्राच्या संस्थापक डॉ. निधी ए. नावंदर (झहऊ) या बाल पुनर्वसन व विकासात्मक मानसशास्त्रज्ञ, पॅरेंट कोच व प्रेरणादायी वक्त्या असून त्यांना २० वर्षांचा अनुभव आहे. वेळीच निदान व हस्तक्षेप केल्यास रुग्ण अधिक सक्षम जीवन जगू शकतो, असे त्यांनी सांगितले.

अभियानात बालविकास, वर्तन समस्या, शिकण्यातील अडचणी, डिस्लेक्सिया, परीक्षा ताण, मोबाईल व्यसन, किशोरवयीन प्रश्र्न, चिंता, नैराश्य तसेच वैवाहिक व कौटुंबिक समुपदेशनावर मार्गदर्शन होणार आहे.

उपक्रमात डॉ. निधी ए. नावंदर, डॉ. लीना सोनी (बालरोगतज्ज्ञ), डॉ. सौरभ दस्क (ऑडिओलॉजिस्ट व स्पीच थेरपिस्ट), डॉ. रसिका शिंदे (फिजिओथेरपिस्ट), डॉ. सोनम सोनी (चऊ, मानसोपचार तज्ज्ञ व ठएइढ प्रशिक्षक), डॉ. अंजू खंडेलवाल (आहारतज्ज्ञ) यांच्यासह ईएनटी सर्जन, न्यूरोलॉजिस्ट व थेरपिस्ट सहभागी आहेत. स्पीच, बिहेवियर, प्ले थेरपी, उइढ, ठएइढ, खट-एट चाचण्या, मेडिटेशन व समुपदेशन सेवा उपलब्ध आहेत.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालय करिअर कट्टा उपक्रमात छत्रपती संभाजीनगर विभागातून प्रथम



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. ३० जानेवारी :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभरात करिअर कट्टा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना वर्षभर पच्या माध्यमातून करिअर विषयक मार्गदर्शन केले जाते.महाविद्यालयाच्या वर्षभराच्या उपक्रमाचा आढावा घेऊन दरवर्षी गणराज्य दिनाच्या दिवशी महाविद्यालयांना पुरस्कार जाहीर केला जात असतो.यावर्षी छत्रपती संभाजीनगर विभागातून सोयगाव येथील संत ज्ञानेश्र्वर महाविद्यालय करियर कट्टा उपक्रमात प्रथम आले आहे.यासोबतच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून उत्कृष्ट करिअर संसद म्हणून महाविद्यालयाचा प्रथम क्रमांक आला आहे.प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांना उत्कृष्ट प्राचार्य तर करिअर कट्टा समन्वयक डॉ.मनोजकुमार चोपडे यांना उत्कृष्ट समन्वयक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महाविद्यालयाचे यशाबद्दल प्राचार्य डॉ.शिरीष पवार, समन्वयक डॉ.मनोजकुमार चोपडे,समन्वयक डॉ.संतोष पडघन,करिअर संसदेचे विद्यार्थी यांचे अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे, सचिव. प्रकाश काळे, संचालक रोहितभैया काळे,मुकुलभैया काळे,उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,पदव्युत्तर समन्वयक डॉ. सी.यु.भोरे, पदव्युत्तर समन्वयक डॉ.रामेश्र्वर मगर,करिअर कट्टा जिल्हा समन्वयक डॉ.श्रीकृष्ण परिहार,कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ. उल्हास पाटील,कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

## ६९ व्या राष्ट्रीय शालेय कराटे स्पर्धेत अभिनील राजभोजचे सुवर्ण यश



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ३० जानेवारी :** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण संचालनालय, पुणे जिल्हा क्रीडा विभाग व क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आणि भारतीय शालेय क्रीडा महासंघाच्या मार्गदर्शनाखाली बारामती येथे पार पडलेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धेत अभिनील बालाजी राजभोज याने सुवर्णपदक पटकावत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली.

परभणी जिल्ह्यातील पूर्णा तालुक्यातील चुडावा गावचा मूळ रहिवासी असलेल्या अभिनीलने ४० किलो वजन गटातील १९ वर्षांखालील मुलांच्या कराटे प्रकारात अव्वल स्थान मिळवले. एसजीएफआय (डलहेश्र ॠाशी ऋशवशीरींळेप ेष खपवळर) आयोजित या स्पर्धेत देशातील ३३ राज्यांमधील खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

लहानपणापासून कराटेची आवड जोपासणाऱ्या अभिनीलने यापूर्वीही जिल्हा, विभागीय व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये अनेक पारितोषिके मिळवली आहेत. या यशासाठी प्रशिक्षक प्रसाद सावंत व संतोष मोहिते यांचे मार्गदर्शन लाभल्याचे त्याने सांगितले. तसेच आई-वडील व कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि सातत्यपूर्ण सराव हेच यशामागील प्रमुख घटक असल्याचेही त्याने नमूद केले.

अभिनील च्या या यशाबद्दल चुडावा गावचे सरपंच गोविंदराव देसाई, उपसरपंच महादजी देसाई, वखार महामंडळाचे संचालक गीताराम देसाई तसेच आमदार रत्नाकर गुट्टे मित्रमंडळाचे अध्यक्ष सुभाष पांडुरंग देसाई यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**जाहीर नोटीस**

**तहसिल कार्यालय, धाराशिव**

(महसूल शाखा)

मेन रोड, धाराशिव पिनकोड, ४१३५०१

दुरध्वनी क्र. ०२४७२- २२७८८२

.Email Id- tahdhavashivgmail.com

जा.क्र.२०२५ /महसूल/जमा-१ /कावि-१५०१ — दि. ३०/०१/२०२६

प्रति,

१) ग्राम महसूल अधिकारी साझा धाराशिव शहर. २) पठाण युनुस खान शमशेर खान, रा. छत्रपती संभाजीनगर. ३) जोहराखानम अबीद हुसेन, रा. शिवाजी चौक निलंगा ता. निलंगा जि. लातूर. (BY RPAD) ४) समीउल्लाखान मुस्तफाखान पठाण, रा. शंकर नगर, खरोळा ता. रेणापूर जि. लातूर. (BY RPAD) ५) इलियास मुस्तफाखान पठाण, रा. शंकर नगर, खरोळा ता. रेणापूर जि. लातूर. (BY RPAD) ६) गौसखान समशेरखान पठाण, रा. पिल्नर नं.१२१ हैद्राबाद. (BY RPAD) ७) कौसरबानू मुस्तफाखान पठाण, रा. शंकर नगर, खरोळा ता. रेणापूर जि. लातूर . (BY RPAD)

८) अमनउल्लाखान समशेरखान पठाण मयत वारस - 8A) रजियाबेगम अमानुल्लाखान पठाण, रा. शिवाजी चौक, कळंब ता. कळंब जि. धाराशिव (BY RPAD) 8B) जियाखान अमानुल्लाखान पठाण, रा. शिवाजी चौक, कळंब ता. कळंब जि. धाराशिव (BY RPAD) 8C) अब्दुल्ला अमानुल्लाखान पठाण, रा. शिवाजी चौक, कळंब ता. कळंब जि. धाराशिव (BY RPAD) 8D) रहेमतुल्ला अमानुल्लाखान पठाण, रा. शिवाजी चौक, कळंब ता. कळंब जि. धाराशिव (BY RPAD) 8E) फरहतउल्ला अमानुल्लाखान पठाण, रा. शिवाजी चौक, कळंब ता. कळंब जि. धाराशिव (BY RPAD) 8F) बरकतुउल्ला अमानुल्लाखान पठाण, रा. शिवाजी चौक, कळंब ता. कळंब जि. धाराशिव (BY RPAD) 8G) अजगरउल्ला अमानुल्लाखान पठाण, रा. शिवाजी चौक, कळंब ता. कळंब जि. धाराशिव (BY RPAD) 8H) हजरत मैनुद्दीन पठाण, रा. शिवाजी चौक, कळंब ता. कळंब जि.धाराशिव (BY RPAD) 8 I ) मुदस्सिरा आयुब बेग, रा. शिवाजी चौक, कळंब ता. कळंब जि.धाराशिव (BY RPAD) 8J) ताहाअल्ताफ पठाण, रा. शिवाजी चौक, कळंब ता. शिवाजी चौक, कळंब जि. धाराशिव (BY RPAD)

विषय - इतर अधिकारातील नोंद कमी करुन मालकी हक्कात नोंद घेणे बाबत. मौ. धाराशिव ता. जि. धाराशिव ग.नं.स.नं. १९/३, ७१७/३, ७१८/३ , ७२०/३ व ७१२/२.

संदर्भ - १) पठाण युनुस खान शमशेर खान, रा. छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दि. १७/१०/२०२५.

वरील प्रकरणी सुनावणीसाठी दि. १२/ ०२/ २०२६ ही तारिख निश्चित केली आहे. तरी आपण सदर तारखेस तहसिल कार्यालय, धाराशिव येथे सकाळी ११.०० वा. आवश्यक त्या कागदपत्रासह लेखी म्हणणे सादर करणे कामी उपस्थित रहावे. अन्यथा आपणास काही सांगणे नाही असे गृहीत धरुन आपले अपरोक्ष प्रकरणात निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

याची एक प्रत घेवुन गोषवारा प्रत स्वाक्षरी करुन परत करावी.

स्वाक्षरित/-

**नायब तहसिलदार (म)**

**तहसिल कार्यालय, धाराशिव**

**जाहीर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद दिवाणी**

किरकोळ अर्ज क्रं. १४/२०२६ नि. क्रं.

१) शोभा दिलीप काळे, वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर २) शितल प्रकाश देशमुख, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. गोद्री, ता. जामनेर, जि. जळगांव ३) सोनाली विलास पाटील, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. बहुलखेडा, ता. सोयगांव, जि. छ संभाजीनगर ४) जागृती प्रतीक पाटील, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम रा. घोसला, ता. सोयगांव, जि. छ संभाजीनगर ५) कमलेश दिलीप काळे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर

विरुद्ध:-

कोणीही नाही

प्रकरण :- वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ड. शुभम अशोक आगे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत दिलीप किसन काळे यांचा दिनांक १३/०९/२०२० रोजी सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार व गैरअर्जदार क्रं १ ते ५ हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ हे मयत दिलीप किसन काळे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २९/०१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ६/०३/२०२६.

आदेशानुसार

**विभागीय लिपीक**

**सहाय्यक अधिक्षक**

**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)**

**जाहीर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ०१/२०२६,नि. क्रं.

१) पांडुरंग बळिराम सोनवणे, वय ७६ वर्षे, धंदा शेती, रा. शिंदोळ, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर

विरुद्ध

१) रविंद्र बळिराम सोनवणे, वय ७४ वर्षे, धंदा शेती रा. शिदोळ, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर २) भगवान बळिराम सोनवणे, वय ७० वर्षे, धंदा शेती रा. शिंदोळ, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर ३) बापु बळिराम सोनवणे, वय ६५ वर्षे, धंदा शेती रा. शिंदोळ, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर ४) कल्पनाबाई अरुण नेरपगार, वय ५० वर्षे, धंदा घरकाम रा. वडजी, ता.भडगांव, जि. जळगांव ५) चित्राबाई जिवन देसले, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम रा. निंभोरा, ता. भडगांव, जि. जळगांव

प्रकरण :- वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ड.शुभम अशोक आगे,सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत बळीराम नागो सोनवणे यांचा दिनांक ३०/०३/२०२१ रोजी शिंदोळ येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार व गैरअर्जदार क्रं १ ते ५ हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ हे मयत बळीराम नागो सोनवणे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २९/०१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता.१३/०२/२०२६. आदेशावरून

**विभीगीय लिपीक**

**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)**

**सहाय्यक अधीक्षक**

**दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) गंगापूर ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर यांच्या न्यायालयात**

सिव्हिल एम.ए. नंबर.५५/२०२६

अर्जदार:-१)अजमतखा महेमुदखा पठाण, वय ७८ धंदा. शेती२)रफतखान महेमुदखान पठाण, वय ६७ धंदा, शेती ३) नदीमखान शौकतखान पठाण, वय ५३ धंदा. शेती ४)असीम शौकत खान, वय ४८ धंदा. शेती. १ ते ४ रा. काझीपुरा, गंगापुर ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर ५)नूजहत बेगम वसिम शेख वय ४६ धंदा. गृहिणी रा. जाली की दरगाह जवळ, कीराडपुरा,छ. संभाजीनगर ता. जि. छ. संभाजीनगर ६)ईशरत बेगम मन्सूर सय्यद वय. ३७ धंदा. गृहिणी रा. जोगेश्वरी, ता. गंगापूर ७)निलोफर फरहतखान पठाण वय, ५३ धंदा. गृहिणी ८)फैजान फरहत खान वय ३२ धंदा शेती ९)नुमान फरहतखान पठाण वय. २४ धंदा. शेती, ७ ते ९ रा. काझीपुरा, गंगापूर ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर १०) अनम फिरदोस अब्दल माजेद शेख वय २८ धंदा. गृहिणी रा. काझी मोहल्ला, कन्नड, ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर ११. सैय्यद हिना लईक अली वय ३५ धंदा. गृहिणी रा. दर्गाह बेस, पोलीस स्टेशन रोड, वैजापूर, ता. वैजापूर जि. छ. संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण:- कलम २ बाम्बे रेगुलेषन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील श्री. दत्ता ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगुलेशन क्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकमी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे कि, अर्जदार नं. १ व २ यांचे वडील, अर्जदार नं. ३,४, ५, ६, ८, ९, १० व ११ यांचे आजोबा आणि अर्जदार नं. ७ यांचे सासरे नामे महेमुद खान सुभान खान हे दि. ०५/०८/२००३ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत. तसेच मयत महेमुद खान सुभान खान यांची पत्नी, अर्जदार नं. १ व २ यांची आई, अर्जदार नं. ३, ४, ५, ६, ८, ९, १० व ११ यांची आज्जी आणि अर्जदार नं. ७ यांची सासू नामे तमीजाबी उर्फ तमीजोबेगम महेमुदखान पठाण हे दि. २५/०२/१९९० रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत.असे की, मयत महेमुद खान सुभान खान व मयत तमीजाबी उर्फ तमीजोबेगम महेमुदखान पठाण यांचा मुलगा ना शौकत महेमूद खान हे दि. ०९/१०/२०२३ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर येथे मयत झाले असून अर्जदार नं. ३ ते ६ हि शौकत महेमूदद खान यांची मुले आहेत. त्यामुळे अर्जदार नं. ३ ते ६ हे नातू या नात्याने मयत महेमुद खान सुभान खान व मयत तमीजाची उर्फ तमीजोबेगम महेमुदखान पठाण यांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच मयत महेमुद खान सुभान खान व मयत तमीजाबी उर्फ तमीजोबेगम महेमुदखान पठाण यांचा मुलगा नामे फरहत महेमूद खान हे दि. २४ /०९/२००१ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर येथे मयत झाले असून अर्जदार नं. ७ हि मयत फरहत महेमूद खान यांची पत्नी असून अर्जदार नं. ८ ते ११ हि मयत फरहत महेमूद खान यांची मुले आहेत. त्यामुळे अर्जदार नं. ८ ते ११ हे हे देखील नातू या नात्याने मयत महेमुद खान सुभान खान व मयत तमीजाबी उर्फ तमीजोबेगम महेमुदखान पठाण यांचे कायदेशीर वारस आहेत. असे कि, अर्जदार हे मयतमहेमुदखान पठाण यांचे कायदेशीर वारस असून.महेमुदखान सुभान खान व मयत तमीजाबी उर्फ तमीजोबेगमअर्जदार यांच्या व्यतिरिक्त इतर कुणीही वारस नाहीत.त्याअर्थी सर्व जनतेस सूचित करण्यात येते कि, मयत महेमुद खान सुभान खान व मयत तमीजाबी उर्फ तमीजोबेगममहेमुदखान पठाण यांचे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनीसदरील आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल महेमुद खान सुभान खान व मयत तमीजाबी उर्फ तमीजोबेगममहेमुदखान पठाण यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नगर येणारा आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. करिता सदरील प्रगटन कोर्टाच्या सही शिक्यानिशी दिले आहे.

पुढील तारीख ०४/०३/२०२६

**कनिष्ठ लिपिक** — आदेशावरून

**सहाय्यक अधीक्षक**

**दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर**

# रेल्वेच्या ए.सी. डब्यातील प्रवासी दाम्पत्याला लुटले

## राज्यराणी एक्स्प्रेसमधील प्रकार ७० हजारांचा मुद्देमाल लंपास, सुरक्षा यंत्रणा कुचकामी; लोहमार्ग पोलीसांत गुन्हा दाखल

**पूर्णा,/प्रतिनिधी:** मुंबई-नांदेड राज्यराणी एक्स्प्रेसच्या वातानुकूलित डब्यात चोरी घटना घडली असून ए.सी. कोचमधील प्रवाशाची तब्बल ७० हजार रुपयांची लूट झाली असून, पुर्णा रेल्वे स्थानकावरील सुरक्षा यंत्रणा पूर्णतः अपयशी ठरल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे.

मुंबई येथुन राज्यराणी एक्स्प्रेसच्या कोच बी/३ मधील बर्थ क्रमांक ३३ व ३४ वरून प्रवास करणारे अरूण गणेशराव हट्टेकर (वय ४२, रा. सफाळे, ता. जि. पालघर) हे आपल्या पत्नीसमवेत मुंबई () येथून नांदेडकडे प्रवास करीत होते. शनिवारी २४ रोजी पहाटे सुमारे ५ ते साडे पाच वाजण्याच्या सुमारास, परभणी स्थानकावरुन गाडी सुटल्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी ते,झोपेत असताना त्यांची ब्राऊन रंगाची लेदर बॅग लंपास केली.हा प्रकार पुर्णा रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर गाडी आली त्यावेळी उघडकीस आला.चोरी गेलेल्या या बॅगेत आयफोन (अंदाजे किंमत ५० हजार रुपये), २० हजार रुपये रोख रक्कम तसेच एटीएम कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड व अन्य महत्त्वाची कागदपत्रे होती. विशेष म्हणजे पुर्णा रेल्वे स्थानकावर चोरटे डब्यातून उतरले असल्याचा संशय प्रवाशांची व्यक्त केला जात आहे.

रेल्वे प्रशासन पुर्णा रेल्वे स्थानकावर सीसीटीव्ही, गस्त आणि सुरक्षा कर्मचारी असल्याचा दावा नेहमीच केला जातो. मात्र प्रत्यक्षात चोरट्यांनी ए.सी. डब्यात शिरून चोरी करूनही कोणालाही संशय येऊ नये, हेच सुरक्षा यंत्रणेच्या ढिसाळ पणाचे जिवंत उदाहरण ठरले आहे.या प्रकरणी नांदेड लोहमार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०२१/२०२६ कलम ३०५ (सी) भारतीय न्याय संहितेनुसार अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

चौकट.... पूर्णा हे जंक्शन ठिकाण असून रेल्वे स्थानकारुन धावणा-या गाड्या तसेच प्लॅटफॉर्मवरवरील सुरक्षा रक्षकांचा अभाव आहे. चो-यांचे सत्र सुरू आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा व कायदेविषयक महाशिबीराचे गंगाखेडाला १४ फेब्रुवारी रोजी आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, तालुका विधी सेवा समिती ,गंगाखेड तसेच जिल्हा प्रशासन यांच्यावतीने दि. १४ फेब्रुवारी, रोजी सकाळी ११ वाजता कापसे मंगल कार्यालय परळी रोड, गंगाखेड येथे विधी सेवा महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या महावेळाव्याचा मुख्य विषय ''ज्येष्ठ नागरिकंसाठीच्या योजना व वैद्यकीय तपासणी'' असून त्या व्यतिरिक्त समाजातील दुर्बल, वंचित घटकांना शासकीय कार्यालयातील विविध लोककल्याणकारी योजनांबाबत जनजागृती करणे तसेच त्याचा लाभ मिळविण्यासाठी कायदेविषयक जनजागृती करणे हा शिबिराचा उद्देश आहे.

जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांतर्गत त्यांच्या कार्यालयाकडून राबविण्यात येत असलेल्या सेवा व योजनांबाबतही माहिती व लाभ देण्याकरीता महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे आणि न्यायमुर्ती संजय ए. देशमुख, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायाधीश, परभणी जिल्हा यांच्या हस्ते महाशिबीराचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम पूर्ण होणार आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नितीशा माथुर याच्या उपस्थितीमध्ये हे महाशिबीर होणार आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी महाशिबीराला उपस्थित राहून शासकीय योजनांबाबत माहिती करुन घ्यावी व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भुषण काळे आणि गंगाखेड वकील संघाचे अध्यक्ष मिलिंद क्षिरसागर यांनी केले आहे.

### रावळे यांच्याकडून श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयास ग्रंथभेट

**जिंतूर,/प्रतिनिधी :** येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील परीक्षा विभागात (वाणिज्य) सहाय्यक अधीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या सुनील सीताराम रावळे यांनी एकूण चार हजार एकशे ऐंशी रुपये किमतीचे ग्रंथ भेट दिले.

क्रमिक अभ्यासक्रम, सामाजिक चळवळ तसेच ललित साहित्य यांचा समावेश असलेले हे ग्रंथ महाविद्यालयाचे ग्रंथपाल विनोद भवाळे यांच्याकडे विद्यापीठ परिसरात सुपूर्द करण्यात आले. माणसाच्या जडणघडणीत ग्रंथांचे महत्त्व अनन्यसाधारण असून, विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच सामाजिक चळवळींची ओळख व्हावी, थोर महापुरुषांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावेत आणि व्यक्तिमत्त्व विकास साधावा, हाच या ग्रंथभेटीमागील उद्देश असल्याचे रावळे यांनी सांगितले. यापूर्वीही त्यांनी स्वखर्चाने विविध महाविद्यालयांना अशा स्वरूपाच्या ग्रंथभेटी दिल्या आहेत.

यावेळी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या तथा संचालिका डॉ. एस. एस. मोकाने, अधीक्षक गणेश कोंडेकर, अनिल कळसकर, आशिष डहाळे, सुनील ढाले, संदीप कांबळे, विनायक जाधव, बळीराम चित्ते, बालाजी डुकरे, गजानन हंबर्डे उपस्थित होते.



## हुतात्मा दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात मौन पाळून आदरांजली

**परभणी,/प्रतिनिधी:** देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आज जिल्हाधिकारी कार्यालयात दोन मिनीटे मौन पाळून आदरांजली वाहण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ ते ११ वा. २ मि. या कालावधीत उपस्थित सर्व अधिकारी- कर्मचारी यांनी मौन पाळून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, पुरवठा अधिकारी विलास मुसळे, नायबतहसिलदार प्रशांत वाकोडकर, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## पूर्णेत बौद्ध धर्म परिषद व स्मृतिशेष भदंत उपाली थेरो यांचा स्मृतिदिनाचे आयोजन

**पूर्णा,/प्रतीनीधी-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार, समकालीन समाजासमोरील प्रश्नांवर धम्माच्या माध्यमातून चिंतन तसेच सामाजिक समता व बंधुतेचा संदेश देण्यासाठी पूर्णेत २३ वी बौद्ध धर्म परिषद व स्मृतिशेष भदंत उपाली थेरो यांचा ४३ वा स्मृतिदिन विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.ही परिषद शनिवार, ३१ जानेवारी आणि रविवार ०१ फ ेब्रुवारी रोजी बुद्ध विहार, भदंत उपाली थेरो नगर, पुर्णा येथे होणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजन बौद्ध विहार स्मारक व बुद्ध विहार समिती, पूर्णा यांच्या वतीने करण्यात आले आहे. परिषदेचे उद्घाटन प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय धम्म अभ्यासक भिक्षु डॉ. ली ची रेन (दक्षिण कोरिया) यांच्या हस्ते होणार असून परिषद अध्यक्ष म्हणून भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो (अखिल भारतीय भिक्षु संघ) उपस्थित राहणार आहेत.



परिषदेत देश-विदेशातील भिक्षु, भिक्षुणी, धम्मसेवक, अभ्यासक व समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी होणार आहेत. परिषदेत अनित्य, दुःख, अनात्म, राजकीय-सामाजिक प्रश्नांवर बौद्ध दृष्टिकोन, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मविचारांचे समकालीन महत्त्व अशा विषयांवर सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रांतून धम्म आणि आधुनिक समाज यांचा संबंध, नैतिक मूल्ये, समता, न्याय व करुणेचा विचार मांडण्यात येणार आहे. यावेळी स्मृतिशेष भदंत उपाली थेरो यांच्या सामाजिक व धम्मकार्याचा गौरव करण्यात येणार असून त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विशेष धम्मदेशना व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे. परिषदेसाठी महाराष्ट्रासह देशातील विविध भागांतून तसेच परदेशातून मोठ्या संख्येने उपासक-उपासिका उपस्थित राहण्याची शक्यता आयोजकांनी व्यक्त केली आहे. ही परिषद बौद्ध धम्माच्या विचारांना नवचैतन्य देणारी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## श्री संत जनाबाई महाविद्यालयात राष्ट्रीय वाणिज्य परिषद संपन्न

**गंगाखेड (प्रतिनिधी)-** येथील श्री संत जनाबाई महाविद्यालयात दिनांक २४ जानेवारी रोजी वाणिज्य विषयावर आधारित एक दिवसीय राष्ट्रीय परिषद अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सदर परिषदेचे आयोजन महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या वतीने करण्यात आले होते.देशातील विविध विद्यापीठांमधील नामवंत वाणिज्य तज्ज्ञ,संशोधक,प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने या परिषदेत सहभागी झाले होते.या राष्ट्रीय परिषदेच्या प्रमुख वक्ते म्हणून उस्मानिया विद्यापीठ,हैदराबाद येथील वाणिज्य विषयातील ज्येष्ठ तज्ज्ञ प्रा. डॉ.डी.चेन्नप्पा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.त्यांनी वाणिज्य शिक्षणातील अलीकडील कल, बदलती अर्थव्यवस्था व सैद्धांतिक आणि व्यावहारिक ज्ञानातील संतुलन यावर सखोल विवेचन केले.आधुनिक काळातील वाणिज्य शिक्षण अधिक परिणामकारक कसे ठरू शकते, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

यावेळी ज्येष्ठ प्राध्यापक प्रा.सैय्यद अझरूद्दिन यांनी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी उद्योजकतेची वृत्ती, नव्या कौशल्यांचा विकास आणि रोजगाराभिमुख शिक्षण आत्मसात




करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.तर प्रा.डॉ.हरिश्चंद्र पतंगे यांनी वाणिज्य शिक्षणातील नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि संशोधनाचा शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी होणारा उपयोग याबाबत सखोल मार्गदर्शन केले.परिषदेमध्ये विविध सत्रांचे चेअरपर्सन म्हणून प्रा.डॉ.मारोती कच्छवे,प्रा.डॉ.रमाकांत घाडगे व प्रा. डॉ.बसवराज लकशेटे यांनी आपली भूमिका यशस्वीरीत्या पार पाडली. तसेच अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा.डॉ. आर.बी.रामपुरे,डॉ.आवडे,डॉ. सुकेशकुमार ढेंबरे,डॉ.बी.एस.पवार यांची उल्लेखनीय उपस्थिती लाभली. अध्यक्षीय समारोपप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ.आत्माराम टेंगसे यांनी वाणिज्य शिक्षणाचे महत्त्व आणि वाणिज्य विषयातील संशोधनाचा उपयोग देशाच्या आर्थिक विकास व कल्याणासाठी व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली.या वेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून स्वा.रा.त.म. विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्राचे अधिष्ठाता व सिनेट सदस्य डॉ. एच.एस.पतंगे,अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रमाकांत घाडगे व डॉ. पी.टी.पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम. धुत,पीएम-उषा समन्वयक डॉ.एस. व्ही.क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. सी. बी. सातपुते,कार्यालयीन अधीक्षक भारत हत्तीअंभीरे आदी मान्यवर उपस्थित होते.

या राष्ट्रीय परिषदेचे कन्व्हेनर व वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. गजानन भुरके, ऑर्गनायझिंग सेक्रेटरी डॉ. वर्षा भुतडा व को-कन्व्हेनर प्रा. अमोल करपे यांनी संयोजनाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. सचिन कलमे व प्रा. कैलास गिरी यांनी केले.

निरोप समारंभप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. रमेशराव मोहळकर व प्रमुख पाहुणे आ. विक्रम काळे उपस्थित होते.या परिषदेमध्ये प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवून चर्चा व विचारमंथन केले. राष्ट्रीय परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील ज्येष्ठ व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले,



## अपक्ष उमेदवार गंगाधर मस्के यांचा महावीरराजे भालेराव यांना जाहीर पाठिंबा

**पालम,(प्रतिनिधी)-** पालम तालुक्यातील चाटोरी गन गट हा पुरुषाला आरक्षित झालेला असून या गटातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार तसेच भाजपा पक्षाचे उमेदवार उद्धव ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार रिंगणात उभे

आहेत तर चाटोरी येथील माजी सरपंच गंगाधर मस्के यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केलेली होती. दिनांक २७ रोजी अधिकृत उमेदवारीचा फॉर्म उचलून उचलून उद्धव ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार महावीरराजे भालेराव यांना जाहीर पाठिंबा दिलेला असून त्यांना विजयी करण्यासाठी गंगाधर मस्के हा कटिबद्ध असल्याचे बोलताना सांगितले. या वेळी डॉ.सिद्धार्थजी भालेराव, अनिल मस्के,वैजेनाथ ईदौरे,मलीकर्जुण सुरणर, काबळे,नखाते सह उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## ज्याच्या नशीबी होता फक्त अंधार..! त्यांना मूकनायकाने दिला जगण्याचा विचार..!!

**परभणी,/प्रतिनिधी:** -भारतीय संस्कृती मध्ये स्वातंत्र्यपूर्वी उच्च,नीच, भेदभाव सारखे विचार प्रस्थापित असून विषमतावादीसंस्कृती अस्तित्वात होती या विषमतेला राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांनी आधुनिक विचाराची मांडणी करत सामाजिक व्यवस्थे विरुद्ध बंड पुकारून समता,स्वातंत्र्य आणि बंधुत्व विचाराची पेरणी करत विषमतेला शह दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना गुरु मानून त्यांच्या विचारांची जोपासना करत आधुनिक विचारांची लढाई जिवंत ठेवली.

३१ जानेवारी १९२० डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पश्यतांचे प्रश्न वर्तमानपत्रातून येण्यासाठी '' मुक्या जीवांचा आवाज '' म्हणून मूकनायक वृत्तपत्राची सुरुवात करत दलितांचे हक्क,अधिकार आणि अस्पृश्यता विरुद्ध लढा यासाठी प्रस्थापित ब्राह्मणवादी व्यवस्थेला शह देत आधुनिक विचारांची पेरणी केली. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यपूर्वी सामाजिक प्रश्नाची जाण नसणारे वृत्तपत्रे दर्पण, प्रभाकर,दिनबंधू,केशरी, मराठा, सुधारक,काल आणि विवेकानंद इत्यादी वृत्तपत्रे अस्तित्वात असताना वरील पैकी कोणतेही वृत्तपत्र सामाजिक प्रश्नाला त्यांनी सुरू केल्यावर वृत्तपत्रात जागा देत नसत त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांची प्रेरणा घेऊन सामाजिक




प्रश्न पाहता सार्वजनिक विहिरीवर पाणी न देणे,अस्पश्य जातींना मंदिर प्रवेश नाकारणे,दलितांवर बहिष्कार टाकने, स्त्रियांवर अन्याय करणे,त्यांचा छळ करणे या बरोबरच दलितांना शाळा प्रवेश नाकारणे, अशा कितीतरी प्रश्नावर नेहमी महिला /दलितांवर अन्याय होत असत. त्या साठीच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी विषमतावादी संस्कृती बदलण्या साठी शिक्षणाला महत्त्व देत सामाजिक प्रश्नांची लढाई तेवत ठेवून शैक्षणिक, सामाजिक प्रश्न आपल्या वृत्तपत्रां मधून प्रकाशित करुन विषमतावादी विचार संपवण्यासाठी समता स्वातंत्र्य आणि बंधुत्वाची ज्योत तेवत ठेवत आधुनिक क्रांती केली.मुक्या जीवांचा आवाज मूकनायक वृत्तपत्र चालवत असताना छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्याकडून आर्थिक मदत घेत पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ ला बहिष्कृत भारत वृत्तपत्र ही काढले.मूकनायक, बहिष्कृत भारत वृत्तपत्राची जबाबदारी दत्तोबा रामचंद्र पवार, याच्यावर छपाई/वितरण व्यवस्था करण्याची जबाबदारी असतानाच शिवराम जाणबा कांबळे, रामजी माळी,गंगाराम कांबळे, यांच्या बरोबरच भास्कर भोसले, केशवराव जेथे,

गंगाधर निळकंठ सहस्त्रबुद्धे हे सामाजिक विषयावर लिखाण करत. त्यांच्या सोबतच नारायण मेघाजी लोखंडे वैचारिक लेख ही लिहित दादासाहेब गायकवाड,भाऊराव गायकवाड यांचाही सिंहाचा वाटा असतानाच सामाजिक क्रांतीचे शस्त्र म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तळागाळातील बहुजनांना मूकनायक आणि बहिष्कृत भारत वृत्तपत्रातून सामाजिक न्यायाची भूमिका विशद केली.

राहुल साबणे-पत्रकार गंगाखेड-८१४९४१७१६१

## अग्रलेख...

# विमान प्रवास आणि सुरक्षितता

दि. २८ जानेवारीच्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा करुण अंत झाला. साऱ्या देशाला या घटनेचा धक्का बसला. तंत्रज्ञान एवढे अद्ययावत झालेले असताना अजूनही विमाने कां कोसळतात किंवा त्यांचे अपघात कां होतात, हा केवळ विमान वाहतुकीच्या क्षेत्रासाठी नव्हे तर सामान्यांच्या मनातलाही प्रश्न. विमान अपघाताची बातमी आल्याबरोबर लोकांना धक्का बसतो. विमान प्रवासाची भीती वाटू लागते. मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले आहे, मंगळावर मोहिमा पाठवल्या आहेत. मानवाने अतिशय बुद्धिमान संगणक बनवले आहेत आणि अत्यंत प्रगत मशीन्स तयार केल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पल्याडही सुपर इन्टेलिजन्सचे वारे वाहू लागले आहेत. विमानांमध्ये आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स यंत्रणा, सेन्सर्स, नेव्हिगेशन सिस्टम्स आणि ऑटोपायलट यंत्रणा अशा अनेक गोष्टी असतात. तरीही अपघात होतात. त्यामुळे विमान प्रवासाच्या सुरक्षिततेबद्दल शंका निर्माण होते. सामान्यांना प्रश्न पडतो, की जर तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असेल तर विमाने पूर्णपणे क्रॅश-प्रूफ का नाहीत?... याचे उत्तर सोपे नाही. विमान वाहतूक सुरक्षित आहे यात वाद नाही. इतर परिवहन व्यवस्थांच्या तुलनेत विमानांचे अपघात कमीच आहेत. तरीही तंत्रज्ञानाला अनेक मर्यादा असतातच. तंत्रज्ञानाद्वारे जोखीम किमान पातळीवर आणली जाऊ शकते, परंतु ती कधीही पूर्णपणे संपत नाही. विमाने अशा वातावरणात उडत असतात, ज्यात भौतिकशास्त्र, हवामान, यांत्रिक प्रणाली आणि मानवी निर्णय या साऱ्यांचा मेळ असतो. चुकीच्या वेळी छोट्या समस्या उद्‌भवतात आणि त्यातून मोठे काही तरी घडते.

अजूनही विमानांचे अपघात कां होतात, हे समजून घेण्यासाठी, आपण प्रथम हे समजून घ्यायला हवे की, विमान हवेत उडते किंवा उडत राहते कारण त्याचे इंजिन उडण्यासाठी आवश्यक असलेली शक्ती निर्माण करते. एरवी गुरुत्वाकर्षण नेहमीच विमानाला खाली खेचण्याचा प्रयत्न करीत असते. यात काहीही बिघडले तरी विमानाचा तोल जाणे शक्य आहे. जमिनीवर धावताना कारचे इंजिन बिघडले तर कार थांबविली जाऊ शकते किंवा थांबते. हवेत उडत असलेल्या विमानाचे इंजिन बिघडले तर वैमानिकाच्या हाती फार वेळ नसतो. वेगामुळे ही परिस्थिती अधिक गंभीर बनते. व्यावसायिक विमाने ताशी सुमारे ८०० किलोमीटर वेगाने प्रवास करतात. छोटी खाजगी जेट विमाने देखील ताशी ५०० ते ६०० किलोमीटर वेगाने जातात. नेमके काय घडते आहे, हे समजून घेण्यासाठी आणि प्रतिक्रिया देण्यासाठी वैमानिकांना फार कमी वेळ मिळतो. उड्डाणाचे सर्वांत धोकादायक टप्पे म्हणजे टेकऑफ आणि लॅण्डिंग. बहुतेक अपघात या दोन टप्प्यांवर होतात. कारण विमान जमिनीच्या जवळ असते आणि वैमानिकांकडे कोणत्याही अडचणीतून सावरण्यासाठी फार कमी वेळ (अगदी काही सेकंदांचा) असतो. लॅण्डिंग दरम्यान हवामान, दृश्यमानता आणि धावपट्टीची परिस्थिती सर्वांत महत्त्वाची असते. क्रूझिंगच्या विशिष्ट उंचीवर असताना काही समस्या निर्माण झाल्यास वैमानिकांना विचार करण्यासाठी आणि कृती करण्यासाठी वेळ मिळतो. जमिनीजवळ असताना तशी परिस्थिती नसते.

याशिवाय, हवामान हा विषय विमान वाहतुकीतील सर्वांत मोठ्या आव्हानांपैकी असतोच. कोणतेही तंत्रज्ञान निसर्गावर नियंत्रण ठेवू शकत नाही. वैमानिकांना धुके, पाऊस, वादळे, जोरदार वारे, वीज इत्यादी गोष्टींचा उड्डाणादरम्यान सामना करावा लागतो. धुक्यामुळे दृश्यमानता इतकी कमी होऊ शकते की शेवटच्या क्षणापर्यंत धावपट्टी दिसत नाही. वादळामुळे वर आणि खाली शक्तिशाली हवेचे प्रवाह निर्माण होतात. पायलट, सह-पायलट, हवाई वाहतूक नियंत्रक, देखभाल अभियंते आणि ग्राऊंड स्टाफ हे सर्व महत्त्वाची भूमिका बजावत असतातच. पण, शेवटी ती माणसेच आहेत. ती तणावग्रस्त होऊ शकतात किंवा गोंधळून जाऊ शकतात. ती सूचनांचा चुकीचा अर्थ लावू शकतात. उपकरणांचे रीडिंगही चुकीचे होऊ शकते. आतापर्यंतच्या अनेक अपघातांच्या चौकशा असे सांगतात की, विमानांचे अपघात हे मोठ्या चुकीपेक्षाही चुकीच्या किंवा त्रुटीपूर्ण मानवी निर्णयांच्या साखळीमुळे घडतात.

विमान हे देखील मशीन आहे आणि सर्व मशीन्सप्रमाणे ते देखील बिघडू शकते. विमानात हजारो सुटे भाग असतात. इंजिन, वायर्स, सेन्सर्स, संगणक, हायड्रॉलिक्स, लॅण्डिंग गियर आणि बरेच काही. देखभालीचे कठोर नियम असूनही, काही भाग जीर्ण होऊ शकतात, काही ठिकाणी दोष निर्माण झालेले असू शकतात. काही वेळा मॅन्युअल अर्थात मानवी नियंत्रण आणि स्वयंचलित नियंत्रण यांच्यात गोंधळ निर्माण होऊ शकतो. जगातील कोणतेही मशीन पूर्णपणे अपयश-प्रतिरोधक नाही. त्याला विमान अपवाद असू शकत नाही. सुरक्षेत पायाभूत सुविधा देखील भूमिका बजावत असते. मोठ्या आंतरराष्ट्रीय विमानतळांवर प्रगत लॅण्डिंग सिस्टम, रडार सपोर्ट, शक्तिशाली रनवे लाईटिंग आणि अचूक हवामानविषयक माहिती देणारी यंत्रणा असते. छोट्या विमानतळांवर या सर्व सुविधा असतीलच असे नाही. अशा ठिकाणी, वैमानिकांना त्यांना जे काही दिसत असते, त्यावरच अधिक अवलंबून राहावे लागते. विशेषतः प्रतिकूल हवामान किंवा रात्रीच्या लॅण्डिंग दरम्यान यामुळे धोका वाढतो. विमान वाहतूक ही अशाप्रकारची जोखीम शक्य तितकी कमी करण्यासाठी डिझाईन केलेली आहे यात वाद नाही. पण, जोखीम शून्य असे डिझाईन अद्याप तयार झालेले नाही. ज्याप्रमाणे रुग्णालयात कोणत्याही रुग्णाचा कधीही मृत्यू होणार नाही याची हमी दिली जाऊ शकत नाही, त्याचप्रमाणे कोणत्याही विमानाचा कधीही अपघात होणार नाही, याचीही खात्री देता येत नाही. अत्यंत कडक सुरक्षा मानके, अनेक बॅकअप सिस्टम आणि भूतकाळातील चुकांपासून सतत शिकणे व सुधारणे त्यासाठी आवश्यक असते. विमान वाहतूक ही सांख्यिकीयदृष्ट्या रस्ते प्रवासापेक्षा बरीच सुरक्षित झाली आहे ती या सुधारणांमुळे आणि त्या सुधारणांच्या मुळाशी पूर्वीच्या चुकाच होत्या.

अनेक लोक विमान वाहतुकीची तुलना अंतराळ मोहिमांशी करतात आणि विचारतात की, आपण मंगळावर जाऊ शकत असू तर आपण विमानांना पूर्णपणे सुरक्षित का बनवू शकत नाही? ही तुलना योग्य नाही. बहुतांशी अंतराळ मोहिमा मानवरहित किंवा दूरस्थपणे (रिमोटली) नियंत्रित असतात, वर्षानुवर्षे त्यांचे नियोजन झालेले असते आणि त्यांना विमानाच्या वाट्याला येणाऱ्या हवामानाच्या प्रतिकूलतेचा सामना करावा लागत नाही. प्रवासी विमाने दररोज ठरलेल्या वेळी उड्डाण व लॅण्डिंग करतात. त्यांची सुरक्षितता मानवी निर्णयांवर अवलंबून असते. सगळे विमान अपघात एकाच कारणामुळे होत नाहीत. ते छोट्या-छोट्या समस्यांच्या साखळीमुळे होतात. हवामानातील प्रतिकूलता, छोटासा तांत्रिक बिघाड, चुकीचा निर्णय हे सारे एकत्रित घडले तर धोकादायक परिस्थिती निर्माण होते. वैमानिकांना फार कमी वेळात यातले नेमके काय ते ओळखावे लागते आणि संचालन करावे लागते. वैमानिक दबावाखाली काम करतात. त्यांच्यावर असंख्य जिवांची जबाबदारी असते. संकट समोर दिसत असताना त्यांचाही ताण वाढत असणार. विचार करण्याची क्षमता प्रभावित होत असणार. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे मेन्टेनन्स अर्थात देखभालीचा. ती देखील मानवी निरीक्षण व कृतीवर अवलंबून असते. तपासणी परिपूर्ण झाली नसेल तर किरकोळ दोष दुर्लक्षित होऊ शकतो आणि तोच मोठा होऊन घातक ठरू शकतो. आकडेवारी स्पष्टपणे दर्शवते की विमान प्रवास हा परिवहनाच्या सर्वांत सुरक्षित मार्गांपैकी एक आहे. लाखो उड्डाणे सुरक्षित चालतात. रस्ते अपघातात मृत्यूची शक्यता विमान अपघातापेक्षा खूप जास्त असते. तथापि, विमानाचा अपघात होतो तेव्हा त्यात प्राणहानी मोठी होते आणि धक्कादायक असे बरेच काही असते. विमान प्रवासाबद्दल नकारात्मकता बाळगण्याचे कारण नाही. आधुनिक काळात तो अनेकांसाठी गरजेचा आहे. तंत्रज्ञानाने जोखीम कमी होऊ शकते. परंतु ते भौतिकशास्त्राचे नियम बदलू शकत नाही, हवामान नियंत्रित करू शकत नाही किंवा मानवी मर्यादांचा मुद्दा निकालात काढू शकत नाही, हे वास्तव दुर्लक्षित करता येत नाही.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# डिजिटल प्रतिकृती : उद्याचे आभासी वास्तव

सयामी जुळे वा जुळ्या व्यक्तीबद्दल आपण जाणतो. साधारण एकमेकांसारखेच दिसणारे आणि काही वेळा एकसारखाच विचार करणारे ते एक व्यक्तिमत्त्व असते. अनेक वेळा जुळे इतके सारखे दिसतात की कोण कुठला हेही ठरवणे अवघड जाते. हे झाले भौतिक विश्वाबद्दल. आता घटकाभर कल्पना करा की, आपली एक प्रतिकृती डिजिटली तयार झाली तर? या प्रतिकृतीला डिजिटल ट्विन (जुळे) असे म्हटले जाते. एखाद्या वस्तूचा डिजिटल ट्विन म्हणजे तिची आभासी प्रतिकृती. ही प्रतिकृती मूळ वस्तू/व्यक्तीची इत्थंभूत माहिती मिळवून पूर्ण जीवनचक्राचे सदृशीकरण (सिम्युलेशन) करते. डिजिटल ट्विन हे एखाद्या वास्तविक वस्तूचे, प्रणालीचे किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिबिंब असते. हे प्रतिबिंब सॉफ्टवेअरच्या साहाय्याने तयार केले जाते आणि वास्तविक वस्तूच्या सर्व वैशिष्ट्यांचे अनुकरण करते.

डिजिटल ट्विन हे एक अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे, जे एखाद्या भौतिक वस्तू, प्रणाली किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिनिधित्व तयार करते. या आभासी प्रतिनिधित्वालाच डिजिटल ट्विन म्हणतात. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल क्षेत्र आणि वास्तविक जगाचे एकत्रीकरण झाले आहे. यामुळे डिजिटल ट्विन तंत्रज्ञान एक अपरिहार्य साधन म्हणून उदयाला आले आहे. या तंत्रज्ञानामुळे उद्योगांना आकार मिळतो आहे, व्यवहारांमध्येही क्रांती घडते आहे. सुरुवातीच्या काळात फक्त उत्पादनाच्या स्तरावर याची कल्पना केली होती. पण आता आभासी जगात आणि भौतिक वास्तवांसाठीही हे डिजिटल तंत्रज्ञान वापरात येणार आहे. डिजिटल ट्विन हा शब्द सगळ्यात पहिल्यांदा मिशिगन विद्यापीठात डॉ. मायकेल ग्रीव्हस यांनी २००२ मध्ये सादर केला होता. सुरुवातीच्या काळात उत्पादन क्षेत्रात ही संकल्पना मांडण्यात आली होती. त्यानंतर ही कल्पना मोठ्या प्रमाणात ॲप्लिकेशन्सचा समावेश करण्यासाठी विकसित झाली. डिजिटल ट्विनमध्ये विविध परिस्थितींचे अनुकरण करून आणि डेटाचे विश्लेषण करून भविष्यसूचक देखभाल, परिपूर्ण व्यवहार आणि उत्पादन विकासामध्ये नावीन्य आणले जाते. भौतिक मालमत्ता आणि प्रक्रियांच्या कामगिरीचे परीक्षण, विश्लेषण आणि त्याची क्षमता वाढवण्यासाठी उत्पादन, आरोग्यसेवा, वाहतूक आणि शहरी नियोजन यासारख्या विविध उद्योगांमध्ये डिजिटल ट्विन्सचा वापर केला जातो. हे तंत्रज्ञान वेगवेगळ्या परिस्थितींची पडताळणी करू शकते, त्याच्या परिणामांचा अंदाज लावू शकते आणि निर्णय घेण्यासाठीही मदत करू शकते.

मेटाव्हर्समध्ये एक आभासी जागा तयार केली जाते. यामध्ये वापरकर्ते डिजिटल वातावरणाशी आणि एकमेकांशी संवाद साधतात आणि डिजिटल ट्विनिंगला अनेक प्रकारे छेदतात. मेटाव्हर्स विकसित होत असताना समग्र आणि एकमेकांशी जोडलेले आभासी जग तयार करण्यासाठी डिजिटल ट्विन कणा म्हणून काम करू शकतात. हे तंत्रज्ञान वापरकर्त्यांना मेटाव्हर्समध्ये स्वतःचे अत्यंत तपशीलवार आणि अचूक प्रतिनिधित्व तयार करण्यास सक्षम बनवू शकते. यामुळे वैयक्तिक स्वरूपाचे आणि खरे असल्यासारखे अनुभव घेता येतात. उदाहरणार्थ, व्हर्च्युअल शॉपिंगमध्ये उत्पादनांचे डिजिटल ट्विन्स खरेदीचे निर्णय घेण्यासाठी वापरकर्त्यांना मदत करू शकतात. शिवाय डिजिटल ट्विन्स मेटाव्हर्समधील विविध मंच आणि यंत्रणांमधील देवाणघेवाण सुलभ करतात. तसेच विविध आभासी वातावरणांमध्ये अखंड संवाद आणि परस्परसंवादही घडवून आणतात. या देवाणघेवाणीमुळे परस्परसंबंधित अनुभव घेता येतात आणि जागतिक स्तरावर सहयोग आणि नवकल्पना वाढीला लागते. डिजिटल ट्विन्स विविध क्षेत्रांमध्ये खोली, समृद्धता आणि कार्यक्षमता वाढवून मेटाव्हर्सचा लक्षणीय विस्तार करू शकतात. याव्यतिरिक्त स्मार्ट शहरे, औद्योगिक संयंत्रे किंवा नैसर्गिक वातावरण यासारख्या संपूर्ण इकोसिस्टिमचा समावेश करण्याच्या उद्देशाने डिजिटल ट्विन वैयक्तिक प्रतिनिधित्वाच्या पलीकडे विस्तारू शकतात. रिअल-टाईम डेटा आणि सिम्युलेशन एकत्र करून हे तंत्रज्ञान बहुआयामी आणि प्रतिसादात्मक आभासी जग आणखी सक्षम करते. यामुळे त्यांच्या भौतिक समकक्षांना जवळून प्रतिबिंबित करता येते. डिजिटल जुळे डेटा स्रोतांशी जोडलेले असतात. परिधान केलेल्या एका छोट्या उपकरणाद्वारे आपले डिजिटल विश्व साठवले जाते. आपण भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे सोशल प्रोफाईल्स, झालेले संभाषण, व्यवहार या सर्व बाबींचा त्यात अंतर्भाव असतो. अनेक वर्षांच्या साठवणुकीनंतर या माहितीचे एआय तंत्राद्वारे पृथक्करण करून काही विशिष्ट साचे, वर्तणुकीचे प्रकार तयार केले जातात. या संकल्पनेचा उपयोग आपल्याला स्मरण केलेल्या गोष्टी साठवण्यासाठी करता येऊ शकतो. मानवी मेंदूमध्ये ही अफाट क्षमता आहे. पण कालानुरूप त्यात त्रुटी निर्माण होतात. अनेकांना विस्मरण होते, एखादी व्यक्ती समोर येते पण नाव आठवत नाही. कधी कधी नाव आठवते, पण व्यक्ती डोळ्यासमोर येत नाही. इथे आपला डिजिटल जुळा आपल्याला मदत करू शकतो. एआयमधील प्रेडिक्टिव्ह अनॅलिटिक्स तंत्रामुळे आपण एखाद्या व्यक्तीला वा एखाद्या ठिकाणी जायच्या आधी त्यासंबंधी माहितीची खातरजमा, उजळणी आधीच करू शकतो. काही टूल्स तुम्हाला हवी तेव्हा रिअलटाईम अर्थात मदत करू शकतात. आपला घसा बसला असेल तर, आपल्या वतीने संभाषणही करू शकतात. यात आपल्या आवाजाचे, लकबींचे पृथक्करण केले असते. फक्त यासाठी आपले संभाषण (अनेक वर्षांचे) रेकॉर्ड केले जाते. यासाठी वेअरेबल (परिधान केलेले संगणकीय उपकरण) वापरले जाते. 'प्लॉड' या एआय उद्योगाने नोट नावाचा एक स्लिम सक्षम ऑडिओ रेकॉर्डर विकसित केला आहे.

हा ऑडिओ तुमच्या फोनच्या मागील बाजूस अडकवला जाऊ शकतो किंवा तुमचे संभाषण रेकॉर्ड करण्यासाठी, हावभाव रेकॉर्ड करण्यासाठी आणि सारांशित करण्यासाठी शर्टच्या खिशात ठेवला जातो. हे तंत्र नेहमी तुमचे संभाषण ऐकते आणि कालांतराने तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमचा प्राधान्यक्रम, संवाद जाणून घेत काही वर्षांत तुमचे डिजिटल जुळे तयार करते. या तंत्रात आणि चॅटजीपीटीसारख्या जनरेटिव्ह एआय टूल्समध्ये बराच फरक आहे. चॅटजीपीटी सार्वत्रिक डिजिटल माहितीसंग्रहाचे पृथक्करण करते आणि माहिती निर्माण करते. इथे तसे नाही, फक्त आपला डिजिटल ट्विन आपल्याशी संबंधित माहितीचे पृथक्करण करतो आणि गरज पडल्यास आपली जागादेखील घेतो. यामुळे आपल्या मानवी मेंदूच्या क्षमता कमी होतील असे काही जणांना वाटते. गुगल मॅप वापरून आपण दिशा शोधतो. इच्छित स्थळ शोधतो. पूर्वी आपण स्मरणशक्तीला ताण देऊन विचारत विचारत एखादा पत्ता शोधत असू. एकदा कष्टाने पत्ता शोधला की कायम लक्षात राहत असे. आता हेच तंत्र सर्वत्र हातपाय पसरू लागले आहे. यामुळे भविष्यात माणसाचे आयुष्य नक्कीच सुसह्य होणार आहे. फक्त एक मोठा धोका आहे तो सुरक्षेचा. आपल्याबद्दल सर्व माहिती सायबर गुन्हेगारांनी चोरली तर ते दुरुपयोग करू शकतात. सर्वच तंत्रांना असा धोका असतोच. त्यामुळे जास्त काळजी घेतली पाहिजे हे वास्तव आहे. तंत्रज्ञान चहुदिशांनी विस्तारत असून प्रगतीची नवनवी कवाडे उघड होत आहेत. त्यातून नित्य नेमाने नवे तंत्रज्ञान जुन्या तंत्रज्ञानाची जागा घेत आहे. यातूनच मानवी विकासाला नवी दिशा मिळत आहे. त्याचा सगळ्यात मोठा फायदा उद्योग आणि सेवाजगत घेत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्र अशाच भराऱ्या घेत राहणार आहे. त्यात तगण्यासाठी आणि स्वविकास साधण्यासाठी तंत्रज्ञांबरोबरच सामान्यांना आणि युवा पिढीला सतत तयारीत राहावे लागणार आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# जुन्या मैत्रीचे नवीन पर्व

विज्ञानाने सारे जग मुठीत घेतले. पण, माणूस दुरावतो, माणुसकी हरवत चाललेली आहे, अशी अनेक दूषणे दिली जातात. नव्या जुन्यांची तुलना करताना आजच्या पिढीवर प्रश्नचिन्हे उभी केली जातात. प्रत्यक्षात आजचे चित्र वेगळे आहे. त्याला भेटावसं, बोलावसं वाटत असेलही. पण, शारीरिक, बौद्धिक क्षमतेच्या वर नोकरी, व्यवसायात तो-ती गुंतून गेले आहेत. माणूस अनेक लोकांमध्ये वावरतो. पण, त्यात कुठे तरी व्यावहारिक झालर असते. पण, शाळा किंवा महाविद्यालयीन जीवनात निर्माण झालेली मैत्री अपेक्षाविरहित आणि मनाच्या खोल कप्प्यात कायमची जपलेली असते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आयुष्य प्रत्येकाला वेगवेगळ्या कारणांनी वेगवेगळ्या दिशांनी घेऊन जाते. नोकरी, व्यवसायासाठी गावाबाहेर जातो, तर कोणी कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांमध्ये इतका गुंततो की जुने मित्र हळूहळू संपर्काबाहेर जातात. अनेक वर्षे सोबत शाळेत गेलेले, एकाच बाकावर बसलेले, डबा वाटून खाल्लेले, एक कट चहा दोघे वाटून घेणारे मित्र विखुरले जातात. कुठल्या तरी सुख दुःखात एकमेकांच्या आठवणी निघतात. चर्चा होते आणि पुन्हा आपल्या गुंताळ्यात सर्व गुंतले जातात.

कोरोनानंतर जगण्याचा अर्थ कळला आणि पुन्हा भूतकाळातील आठवणींना उजाळा दिला जातो. अशा परिस्थितीत 'व्हॉट्सॲप'सारख्या माध्यमाने शाळेतील मित्रांना पुन्हा एकत्र आणण्यात मोठी भूमिका बजावली आहे. एखादा जुना मित्र, मैत्रीण पुढाकार घेते. संपर्क शोधले जातात आणि हळूहळू एक व्हॉट्सॲप ग्रुप तयार होतो. अगदी विदेशात राहूनही आपले वर्गमित्र शोधून त्यांना व्हॉट्सॲपच्या माळेत गुंफले जाते. पहिल्या काही दिवसांत ओळख परेड होते. नावं ओळखीची वाटतात, पण चेहरा आठवत नाही. मुली सासरी गेल्याने त्यांची सासरची आडनावं कळत नाही. अशा वेळी कुणी जुन्या आठवणी काढतो, कुणी वर्गातल्या खोड्यांचा उल्लेख करतो तर कुणी शिक्षकांचे किस्से सांगतो. याच संवादातून माजी विद्यार्थी स्नेहमिलन मेळाव्याची कल्पना पुढे आली असावी. आज गावागावांत माजी विद्यार्थी मेळावे होत आहेत. बऱ्याच मेळाव्यांसाठी देशविदेशातून मित्र येतात. शाळेच्या जुन्या आठवणींमध्ये ते रमून जातात. हिंगणघाट येथे मोहता शाळेतील माजी विद्यार्थी इक्राम हुसैन यांनी शाळेला ११ हजारांची भेट दिली. मेहकर येथे ज्येष्ठ पत्रकार नितीन कुळकर्णी यांच्या १९८८ च्या तुकडीने तर एक दिवस अख्खी शाळा डोक्यावर घेतली होती. वर्धेतील १९९० सालच्या तुकडीने मंदार अभ्यंकर यांच्या नेतृत्वात रत्नीबाई विद्यालयातील माजी शिक्षकांचा सत्कार केला. १९९१-९२ च्या तुकडीने २०१६ मध्ये मथुरादेवी शाळेतील माजी विद्यार्थी उद्योजक वैभव काशिकर, सचिन अग्निहोत्री यांनी लहानपणी शाळेत सांभाळ करणाऱ्या मावशींचा सन्मान केला होता. न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये १९८९ च्या तुकडीने प्रदीप बजाज यांच्या पुढाकारात झालेल्या विद्यार्थी मेळाव्यात शाळेला मराठी भाषेची प्रयोग शाळा, वॉटर कूलर, खुर्च्यांची भेट दिली होती. अमरावती जिल्ह्यातील जरूड येथील १९९० च्या तुकडीच्या माजी विद्यार्थ्यांचा व्हॉट्सॲप ग्रुप अमेरिकेतील मैत्रीण ममता गोळे हिने तयार केला.

आठवणी ताज्या करताना प्रदीप सातपुतेने शाळेतील पाण्याच्या टाकीची अवस्था बघून डोळ्यात पाणी आल्याची भावना व्यक्त करताना शाळेचा जिव्हाळा जाणवतो. त्याचे कारण म्हणजे शिक्षणाचे बाजारीकरण झाले नव्हते आणि शिक्षक व्यावहारिक नव्हते. शाळेला काचेचे मुलामे चढले नव्हते. तिथे सर्व समान होते. माजी विद्यार्थी मेळाव्यात चेहऱ्यावर वयाची छाया दिसते, केस पांढरे झालेले असतात. पण, माजी विद्यार्थी मेळावा आठवणींचा, भावनांचा आणि आत्मीयतेचा संगम ठरतो. माजी विद्यार्थी मेळावे हे समाजाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरतात. यातून सामाजिक बांधिलकी वाढते, एकमेकांना मदतीची भावना निर्माण होते आणि भविष्यातील पिढ्यांसाठी आदर्श उभा राहतो. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास नाती कशी जपता येतात, याचं हे जिवंत उदाहरण आहे. माजी विद्यार्थी मेळावे नात्यांचं पुनर्बांधणीचं काम करतात. या माध्यमातून मैत्रीचा पूल बांधला जातो. परंतु, आजच्या मानसिकेतेत त्याचा विपर्यासही होता कामा नये! माजी विद्यार्थी मेळाव्याच्या माध्यमातून कोणाच्या वैयक्तिक आयुष्यात विनाकारण न डोकावता हा मैत्रीचा सेतू असाच वाढत जावा त्याचे एक नवीन कुटुंब तयार व्हावे! कामाच्या प्रचंड व्यापात असलेल्यांना आता कुठेतरी एकत्र यावेसे वाटते आहे. माजी विद्यार्थी मेळावा हा त्याची पायरी ठरावा आणि विखुरलेले कुटुंब एकत्र येत संयुक्त कुटुंब पद्धती या जुन्या मैत्रीतील नव्या पर्वाचे शिखर ठरावे.

९८८१९०३७६५

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# राजदमध्ये 'तेजस्वी' युग सुरू

मागील आठवड्यात राजधानी दिल्लीत मूळ बिहारचे असलेले नितीन नवीन यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारली असताना बिहारमध्ये आणखी एक मोठी राजकीय घडामोड झाली. राजदचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून तेजस्वी यादव यांची निवड झाली. राष्ट्रीय जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्षपद आतापर्यंत लालूप्रसाद यादव यांच्याकडे होते. आता तेजस्वी यादव यांना राजदचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष बनवत राजदने त्यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचा मार्ग प्रशस्त केला आहे.

लालूप्रसाद यादव ७८ वर्षांचे आहेत, दुसरीकडे त्यांची प्रकृतीही त्यांना आता पहिलेसारखी साथ देत नाही. त्यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या आहेत. मुलगी रोहिणी आचार्यने दिलेल्या किडनीवर त्यांचे उर्वरित आयुष्य सुरू आहे. पक्ष वाढवण्यासाठी जी धावपळ करावी लागते, ती करण्याची क्षमता आता त्यांच्यात उरली नाही. काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाचा प्रचारही ते करू शकले नाहीत. त्यामुळे राजदला नव्या दमाच्या नेतृत्वाची गरज होती, ती तेजस्वीच्या रूपात पूर्ण झाली, असे म्हणायला हरकत नाही. तसेही गेल्या काही वर्षांपासून तेजस्वी यादवच पक्षाची धुरा सांभाळत आहेत.

देशातील राष्ट्रीय पक्षांनी आपले नेतृत्व तरुण पिढीकडे सोपवण्याची प्रक्रिया सुरू झाली, असे या घटनाक्रमावरून म्हणायला हरकत नाही. याला अपवाद फक्त काँग्रेसचा म्हणावा लागेल. काँग्रेसचे नेतृत्व ८० वर्षीय वयोवृद्ध नेत्याकडे आहे. रामविलास पासवान यांनी लोजपाचे नेतृत्व आपल्या मुलाकडे म्हणजे चिराग पासवानकडे सोपवले होते. त्या मालिकेत आता लालूप्रसाद आले आहेत.

काही महिन्यांपूर्वी झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत राजदचे पुरते बारा वाजले. राजदने ही निवडणूक महाविकास आघाडीच्या नावावर काँग्रेस आणि डाव्या पक्षांसोबत आघाडी करून लढवली होती. या आघाडीने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले होते. मुख्यमंत्रिपदाचे स्वप्न पाहणाऱ्या तेजस्वी यादव यांना कसेबसे विरोधी पक्षनेतेपद मिळवता आले.

५ जुलै १९९७ ला लालूप्रसाद यादव यांनी जनता दलातून बाहेर पडत दिल्लीत राष्ट्रीय जनता दल आपल्या पक्षाची स्थापना केली होती. गंमत म्हणजे त्यांनी दोनदा बिहारचे मुख्यमंत्रिपद भूषवले. पण ते राजदचे मुख्यमंत्री नव्हते, तर जनता दलातर्फे मुख्यमंत्री झाले होते. चारा घोटाळ्यात तुरुंगात जायची वेळ आल्यामुळे लालूप्रसादांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. पण आपल्या जागेवर पत्नी राबडीदेवी यांना मुख्यमंत्री बनवत मुख्यमंत्रिपद आपल्या घरातच ठेवण्याचा, आतापर्यंत कोणत्याही राजकीय नेत्याला सुचला नाही, असा मार्ग निवडला. राजकारणाचा गंध नसलेल्या राबडीदेवी यांनी एक, दोनदा नाही तर तीन वेळा राजदच्या नेत्या म्हणून बिहारचे मुख्यमंत्रिपद भूषवले.



बिहारमध्ये कधीकाळी लालूप्रसादांचा प्रभाव होता. चारा घोटाळ्यात तुरुंगात जावे लागल्यानंतरही तो काही प्रमाणात कायम होता. त्यामुळेच 'जब तक रहेंगा समोसे में आलू, तब तक रहेंगा बिहार में लालू' असे म्हटले जात होते. समोस्यातील आलू नेहमीसाठी कायम आहे. मात्र बिहारमधून लालूंचा प्रभाव नंतरच्या काळात कमी होत गेला. मुस्लिम आणि यादव अशा 'एमवाय' समीकरणाच्या आधारे लालूप्रसादांनी बिहारमध्ये राज्य केले, पण नंतर हे समीकरण म्हणजे मुस्लिम आणि यादव हा हक्काचा मतदारही त्यांच्या राजदपासून दूर झाला. तसे नसते तर २०२५ च्या विधानसभा निवडणुकीत लालूप्रसादांच्या राजदचा दारुण पराभव झाला नसता. लालूप्रसादांना मोठा तेजप्रताप आणि लहान तेजस्वी अशी दोन मुले आहेत. लालूप्रसादांचा ओढा हा सुरुवातीपासून तेजस्वीकडे राहिला. त्यामुळे तेजप्रतापला डावलत त्यांनी तेजस्वीला आपला राजकीय वारस घोषित केले. तेजस्वीला मुख्यमंत्री म्हणून पाहायचे लालूप्रसादांचे स्वप्न होते. त्यासाठी वेगवेगळे प्रयोग त्यांनी केले. आपले कट्टर राजकीय विरोधक नितीशकुमार यांच्याशी आघाडी करायलाही मागेपुढे पाहिले नाही. २०१५ ची विधानसभा राजदने राज्यात नितीशकुमारांच्या जदयुसोबत आघाडी करून लढवली. या निवडणुकीत राजदला ८० तर जदयुला ७१ जागा मिळाल्या. जागा कमी असतानाही नितीशकुमार मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात तेजस्वी यादव उपमुख्यमंत्री झाले. तेजप्रतापचाही मंत्रिमंडळात समावेश झाला. पण हे सरकार फार काळ टिकले नाही.

२०२० ची विधानसभा निवडणूक राजदने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करून लढवली. या निवडणुकीत राजद आघाडीला ११० जागा मिळाल्या, म्हणजे बहुमतापेक्षा फक्त १२ जागा कमी. यात राजदच्या सर्वाधिक म्हणजे ७५ जागा होत्या. काँग्रेसला १९ तर डाव्या पक्षांना १६ जागा मिळाल्या. यावेळी तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाने हुलकावणी दिली.

२०२५ च्या विधानसभा निवडणुकीत तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे पानिपत झाले. महाविकास आघाडीला ३३ जागा मिळाल्या. यात राजदच्या २५, काँग्रेसच्या ६ तर भाकपा मालेच्या २ जागांचा समावेश होता. या निवडणुकीत तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री म्हणून पाहण्याचे लालूप्रसादांचे स्वप्न पूर्णपणे बेचिराख झाले. राजदच्या नावातच फक्त राष्ट्रीय हा शब्द आहे. कधीकाळी हा पक्ष औटघटकेसाठी राष्ट्रीय पक्ष होताही. आता हा पक्ष बिहारपुरताच मर्यादित झाला आहे. आधी झारखंडमध्ये या पक्षाचा थोडा फार प्रभाव होता. पण आता तो तेवढाही राहिला नाही. २००८ मध्ये राजदने ईशान्येकडील काही राज्यांत यश मिळवले. त्यामुळे या पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला. २०१० मध्ये मात्र राजदचा राष्ट्रीय पक्षाचा दर्जा जो निघाला, तो पुन्हा कधी त्याला मिळाला नाही आणि आता मिळण्याची दूरदूरपर्यंत शक्यताही नाही.

तेजस्वी यादव आता कधीच मुख्यमंत्री होण्याची शक्यता नसल्यामुळे लालूप्रसादांनी आपल्या राजकारण संन्यासाची अप्रत्यक्ष घोषणा करत पक्षाची संपूर्ण सूत्रे तेजस्वी यादव यांच्याकडे सोपवली. पण कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून तेजस्वी यादव यांची वाटचाल वाटते तितकी सोपी नाही. जदयु आणि भाजप यांचे कडवे आव्हान तर त्यांच्यासमोर आहे, पण त्यांना त्याआधी आपल्या घरातील भाऊबंदकीचा सामना करावा लागणार आहे. मोठा भाऊ तेजप्रताप याने राजदमधून हकालपट्टी झाल्यावर नव्या राजकीय पक्षाची स्थापना केली. लालूप्रसादांना किडनी देत जीवनदान देणारी रोहिणी आचार्य यांनीही तेजस्वी यादव यांच्या निवडीवर जाहीरपणे नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे तेजस्वी यादव यांच्यासाठी रात्रच नाही तर दिवसही वैऱ्याचा आहे. त्यामुळे नाव तेजस्वी असले तरी तेजस्वी यादव पक्षात तेजस्वी युग आणतील, याची शक्यता कमीच दिसते.

९८८१७१७८१७

### पोलिसांनी केलेले समुपदेशन लाभदायक

कौटुंबिक स्वरूपाचे गुन्हे कमी व्हावेत यासाठी भरोसा सेल, दामिनी पथक, सामाजिक सुरक्षा पथक हे नेहमी सकारात्मक प्रयत्न करीत असतात. मागील वर्षी महिला दिनाच्या दिवशी धरमपेठ पॉलिटेक्निक या महाविद्यालयात प्रमुख अतिथी म्हणून पोलिस प्रशिक्षण केंद्र येथील पोलिस निरीक्षक शुभांगी वानखेडे उपस्थित होत्या. त्यांनी अनेक उदाहरणे देऊन अगदी क्षुल्लक कारणावरून भांडणे विकोपाला जातात आणि गुन्हे घडतात आणि कुटुंब मोडते. अशा वेळी पोलिस समुपदेशन करतात. बऱ्याच वेळा कौटुंबिक कलह संशयी स्वभावामुळे होतात. यात दोन्ही बाजू ऐकून दोघांनाही समुपदेशन केल्याने बऱ्याच अंशी हिंसा, कलह टळून गैरसमज दूर झाल्याचे दिसून आले आहे. योग्य समुपदेशनाने गुन्हेगाराला चूक सुधारण्याची संधी मिळते आणि कुटुंब अबाधित राहते. पोलिसांच्या समुपदेशनामुळे कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये २१ टक्क्यांनी घट झाल्याचे वृत्त समोर आले आहे. हे नक्कीच आशादायी चित्र आहे.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### स्वीकृत नगरसेवक सामाजिक क्षेत्रातून हवेत

राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका निवडणुकांनंतर लोकनिर्वाचित नगरसेवक शहर विकासाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्याचबरोबर प्रत्येक नगरपालिका व महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक नेमण्याची तरतूद आहे. हा अधिकार राजकीय पक्षांकडे असला तरी तो केवळ राजकीय समतोलासाठी न वापरता सामाजिक विकासासाठी वापरण्याची गरज आहे.

पत्रकार, लेखक, पर्यावरणवादी, निवृत्त सैन्य व अग्निशमन अधिकारी, समाजसेवक, विचारवंत अशा निष्ठावंत सामाजिक कार्यकर्त्यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी दिल्यास नगरपालिका, महानगरपालिकेच्या कामकाजाला नवी ऊर्जा मिळेल. अशा व्यक्तींचा अनुभव, अभ्यास व समाजाशी असलेली बांधिलकी शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देऊ शकते. राजकारणाबरोबरच सामाजिक कार्यालाही मानाचे स्थान देत, सरकार व सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन स्वीकृत नगरसेवकांची निवड सामाजिक पातळीवर केल्यास राज्यातील नगरपालिका, महापालिकांचे चित्र बदलू शकते. असा निर्णय घेतल्यास सामाजिक कार्याला नवी चालना मिळेल आणि राज्याचे नाव देशपातळीवर सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

## वाचक पत्रे

### अरिजित सिंहची निवृत्ती



अरिजित सिंह सर्व संगीतप्रेमींना मनापासून भावणारा स्वर. सिने जगतातील एक तरुण स्वर असलेला लाडका पार्श्वगायक. संगीत ही एक आजन्म करावयाची साधना आहे आणि त्यासाठी शिकणे, नवे प्रयोग करणे आवश्यक आहे. संगीत कला ही मनामनाला जोडणारी आहे आणि स्वरसाधना तर थेट परमेश्वराशी संवाद साधते. अरिजित यांची संगीत निवृत्ती ही घोषणा संगीतप्रेमींना अत्यंत धक्कादायक वाटली पण त्यामागे संगीत क्षेत्रात अजून काही भरीव कामगिरी करण्याचा प्रयत्न अधिक सुखावह आहे. त्यांची अनेक लोकप्रिय गीते रसिकांना मंत्रमुग्ध करतात. हिंदीबरोबरच बंगाली, तमिळ, तेलगू, मल्याळम, मराठी अशा अनेक भाषांतील गाणी ही पुन्हा पुन्हा ऐकावी अशीच आहे.

आज प्रत्येक व्यक्ती प्रसिद्धी आणि पैसा यामागे जीव तोडून धावत आहे. जगात प्रत्येक क्षेत्रात प्रचंड स्पर्धा आहे आणि अशा वेळी हा अतिशय अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. साधी राहणी, नम्र स्वभाव हा या गायकाचा एक गुण म्हणता येईल.कारकीर्दीच्या सर्वोच्च शिखरावर असताना निवृत्ती जाहीर करणे म्हणजे अहंकारावर केलेली मात आहे. मी आणि माझे यातून निवृत्त होऊन मनाची शांती मिळवणे ही स्थितप्रज्ञ वृत्ती आहे. संगीत ही साधना आहे आणि साधना सिद्ध करायची तर या जगाच्या झगमगाटापासून दूर झाल्याशिवाय ती साध्य होणार नाही. साधनेचा हा ध्यास व्यक्तीला इप्सित साध्य करण्यासाठी लाभदायक असतो. स्वतःचा शोध घेण्याची वृत्ती अंगीकारली पाहिजे हे निश्चित. त्यागयुक्त भोग हेच खरे जगणे आहे. सर्वांत राहून देखील अलिप्त राहणे ही तपस्या आहे. यश आणि सत्य यात सत्याचा शोध महत्त्वाचा आहे. खरोखरच माया भुरळ घालते पण त्यातून सावरले पाहिजे हाच संदेश या प्रथितयश गायकाने दिला आहे हे निश्चित. तुम ही हो, चन्ना मेरे आ, केसरीया, ए दिल है मुश्किल अशा एकापेक्षा एक सरस गीतांच्या लहरींवर स्वार होत नवीन अधिक उत्तम संगीत लवकरच येईल ही आशा मानत आहे. अरिजित यांना संगीत क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी हार्दिक शुभेच्छा!

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नेते-कार्यकर्त्यांच्या कात्रीत अडकले उमेदवार

## 'मान एकाला, मत दुसऱ्याला' मोहिमेने देवणी निवडणुकीत रंगत

**तभा वृत्तसेवा/रियाज मोमीन**
**वलांडी, दि. ३० जानेवारी :** देवणी तालुका हा भाजपाचा बालेकिल्ला मानला जात असला तरी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत सत्तापालटासाठी काँग्रेसने जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने सत्ताबदलाचा विडा उचलला असताना, भाजपाने निलंगेकर बंधूंनी आपली राजकीय प्रतिष्ठा पणाला लावत सत्ता कायम राखण्याचा निर्धार केला आहे. मात्र, दोन्ही प्रमुख पक्षांकडून उमेदवारी जाहीर करताना नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये अपेक्षित समन्वय साधला न गेल्याने उमेदवार अक्षरशः नेते-कार्यकर्त्यांच्या कात्रीत अडकल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी उमेदवारी देताना दोन्ही पक्षांनी शेवटपर्यंत कमालीची गुप्तता पाळली. जवळगा जिल्हा परिषद गटात तर ऐनवेळी उमेदवार बदलण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. स्थानिक व निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या अपेक्षा डावलत, नेत्यांनी आपल्या सोयीनुसार उमेदवारी लादल्याचा आरोप होत असून त्यामुळे पक्षांतर्गत असंतोष उघडपणे समोर येत आहे.

भाजपाने जातीय सक्षमीकरणाचे गणित मांडत जवळगा मतदारसंघात गट व गणासाठी लिंगायत उमेदवार, तर वलांडी गट व गणात मराठा उमेदवार दिले आहेत. परिणामी मराठा व लिंगायत मतदारांची भूमिका काय राहणार, तसेच 'खाली एक धरा, वर एक धरा' असा नवा प्रचारफॉर्म्युला कितपत यशस्वी ठरणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यामुळे भाजपातील नेत्यांची मोठी कसरत पाहायला मिळणार आहे.

आम्ही प्रचारात फिरत नाही, पण निकाल फिरवू शकतो...

दुसरीकडे काँग्रेसने वलांडी व जवळगा गट-गणात जातीय समीकरणांचा समतोल राखत स्थानिक उमेदवारांना संधी दिली आहे. मात्र वलांडी गटात बहुसंख्य असलेले मुस्लिम व दलित मतदार कोणती भूमिका घेतात, यावर काँग्रेसच्या विजयाचे गणित अवलंबून असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

इतर मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या बोरोळ जिल्हा परिषद गटात काँग्रेसने सामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला उमेदवारी देत 'न्यायाची भूमिका' मतदारांपुढे ठेवली आहे. याउलट भाजपाने या गटात गटाबाहेरील कार्यकर्त्याला उमेदवारी दिल्याने नाराजीत भर पडली आहे. या दोन्ही उमेदवारांना निवडून आणण्याची जबाबदारी कोणी घेतली आणि दुखावलेले कार्यकर्ते कितपत साथ देतात, हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, तिकीट वाटपाच्या धोरणामुळे दोन्ही पक्षांत कार्यकर्त्यांमध्ये दुफळी निर्माण झाली असून सोशल मीडियावर 'मान एकाला मत दुसऱ्याला' अशा पोस्टद्वारे निष्ठावंत कार्यकर्ते आपली खदखद व्यक्त करत आहेत. विशेष म्हणजे दोन्ही पक्षांतील अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते अद्याप प्रचारापासून दूर असल्याने, त्यांची ही 'गुपचेपी' नेमकी कोणाची 'गळचेपी' ठरणार, याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

एकूणच देवणी तालुक्यातील ही निवडणूक आता थेट पक्षांमधील लढतीपेक्षा पक्षांतर्गत नाराजी, गटबाजी आणि मतदारांच्या अनिश्र्चित भूमिकेमुळे अधिकच रंगतदार ठरत असल्याचे चित्र आहे.

# उदयगिरीत भूगोल दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. ३० जानेवारी :** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात भूगोल दिन व बक्षीस वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. भूगोल दिनानिमित्त घेण्यात आलेल्या भूगोल सामान्य ज्ञान स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना यावेळी बक्षिसे प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री हावगीस्वामी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. ए. काळगापुरे उपस्थित होते. प्रारंभी पृथ्वी गोलाचे पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ. काळगापुरे यांनी भूगोल दिनाचे महत्त्व, भूगोल विषयातील करिअरच्या संधी व भविष्यातील आव्हाने याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. हल्लाळे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. एम. पी. मानकरी यांनी केले. सूत्रसंचालन कुमारी सोनी कांबळे हिने केले, तर पाहुण्यांचा परिचय कुमारी रोहिणी कांबळे हिने करून दिला. बक्षीस वितरणाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. जे. कुलकर्णी यांनी केले. आभार डॉ. ए. यू. नागरगोजे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. ए. के. वळवी, प्रा. प्रियंका रंगवाळ व श्री संतोष चिघळीकर यांनी सहकार्य केले.

# मंगेशकर महाविद्यालयाच्या जान्हवी बिरादार व गायत्री पुरी यांचे 'गांधी विचार संस्कार' परीक्षेत यश





**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. ३० जानेवारी :** तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव यांच्या 'गांधी विचार संस्कार परीक्षा - २०२५' या राष्ट्रीय स्तरावरील संपन्न परीक्षेत जान्हवी दत्ता बिरादार (बारावी वाणिज्य) यांनी लातूर जिल्ह्यातून 'द्वितीय क्रमांक' व गायत्री अनिल पुरी (बी.कॉम.प्रथम वर्ष) यांनी लातूर जिल्ह्यातून 'तृतीय क्रमांक' संपादन करून पारितोषिक मिळविले आहे. महाविद्यालयातील इतिहास विभाग व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. प्रस्तुत परीक्षेत एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपसचिव पंकज बियाणी, सर्व संचालक मंडळ तथा संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. शंकर कल्याणे, इतिहास विभागप्रमुख डॉ.सचिन हंचाटे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा.आशीष खडकेश्र्वर, डॉ. अशोक नारनवरे, डॉ.सुचिता किडीले, प्रा.प्रमोद मरगणे, प्रा.बलभीम सातपुते, डॉ.जाफर चौधरी, डॉ.विनोद चिंते, डॉ.प्रदीप पाटील, डॉ.आनंद मुसळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी जान्हवी बिरादार व गायत्री पुरी यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

> प्रस्तुत परीक्षेच्या माध्यमातून महात्मा गांधी यांच्या विचार व कार्याची सविस्तर माहिती मिळून माझ्या ज्ञानात मोलाची भर पडली आहे. महाविद्यालयामध्ये प्रस्तुत परीक्षेचे आयोजन केल्याबद्दल गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव आणि महाविद्यालयातील इतिहास विभाग व मराठी विभाग यांची मी आभारी आहे. तसेच पारितोषिक संपादन केल्याचा मला आनंद व समाधान आहे.
>
> **– गायत्री अनिल पुरी**
> **(बी.कॉम.प्रथम वर्ष)**

# महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी निलंगा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन





**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. ३० जानेवारी :** दिनांक २४ /१ /२०२६ रोजी महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी निलंगा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दापका येथे विशेष वार्षिक श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाल. यावेळी मंचावर प्राचार्य डॉ.एस. एस. पाटील, श्री. डी. के. पाटील, मुख्य शाखा अधिकारी, एल आय सी निलंगा, डॉ. दिनकर पाटील , डॉ प्रतिभा पाटील, डॉ. शहाबाज वाढवणे, डॉ.अश्र्विन कोडगी, डॉ .माने जयश्री ,श्री बोयने, मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा दापका आणि श्री ओमजी बाहेती, उपाध्यक्ष केमिस्ट असोसिएशन लातूर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील गरड व विद्यार्थी प्रतिनिधी श्री विकास जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. एस एस पाटील यांनी महाविद्यालया तर्फे होत असलेल्या सात दिवसीय विशेष वार्षिक श्रमसंस्कार शिबिरातील विविध दैनंदिन कार्यक्रमाची रूपरेषा सांगून राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व व सामाजिक बांधिलकी जपण्याचे तसेच दापका येथील ग्रामस्थांनी या शिबिरा मध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आव्हान केले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा एल.आय.सी. मुख्याधिकारी श्री.डी.के.पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपला सर्वांगीण विकास साधावा व समाजामध्ये विविध गोष्टीची जनजागृती करावी असे आवाहन केले. यावेळी दापका ग्रामस्थांसाठी औषधी वाटपाचे नियोजन व उपजिल्हा रुग्णालय निलंगा येथील सर्व डॉक्टर्सची टीम यांनी ग्रामस्थांची आरोग्य तपासणी केली. पुढील सात दिवसांमध्ये युवकांसाठी जलसंधारण व्यवस्थापन व ओसाड भूमी विकास या विषयावरती तज्ञ मंडळी कडून ग्रामस्थांसाठी मार्गदर्शन व कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील तृतीय वर्षातील विद्यार्थिनी कु. शिंदे वैष्णवी तसेच आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील गरड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तंत्रज्ञ नारायणसिंग राजपूत, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी

# अजितदादा पवार यांना श्रध्दांजली वाहुन शिवनाम सप्ताहास प्रारंभ





**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. ३० जानेवारी :** ओंकारेश्वर महादेव मंदिर शिवलिंग प्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळ्यानिमित्त आयोजित अखंड शिवनाम सप्ताहास अजितदादा पवार यांना श्रध्दाजली वाहुन प्रारंभ झाला.

एस.टी. कॉलनी, पोस्ते नगर नविन वसाहत मलकापुर येथील ओंकारेश्वर महादेव मंदिरात श्रीगुरु हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात ओंकारेश्र्वर महिला भजनी मंडळाच्या वतीने आयोजित शिवलिंग व नंदकिशोर प्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा संपन्न होणार असुन यानिमित्य शिवनाम सप्ताह,परमरहस्य ग्रंथाचे पारयणास शुक्रवार दि. ३० जानेवारी रोजी सकाळी ठिक ११ वाजता माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रध्दांजली वाहुन प्रारंभ झाला. पोरौहित्यकार शि.भ.प. रतिकांत स्वामी यांचे उपस्थितित ओंकारेश्वर महिला भजनी मंडळाचे अध्यक्षा सौ. सरुबाई विष्णूकांत हलबर्गे, सचिव सौ. वनमाला अशोक कते,सौ. शितलताई दिगंबर बिरादार यांच्या हस्ते गणेश प्रधान कलश,पंचाचार्य स्थापना पुजा व विनापुजन करुन शिवनाम सप्ताहास प्रारंभ झाला. यावेळी अन्नदाते मुकेश भालेराव ,सरपंच गुरुनाथ बिरादार,शंकर भालके, सौ.शितल शिवराज माळेवाडे यांच्या हस्ते आरती संपन्न झाली. तर शिवकिर्तन शि.भ.प. सौ.निकिता स्वामी खंडाळीकर यांचे किर्तन संपन्न झाले.



राज्याचे लाडके उप मुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार साहेब यांचे काल दुःखद निधन झाले. ते आपल्या सर्वांना सोडून अकाली अपघातात निघून गेले अतिशय जड अंतःकरणाने त्यांना शिरूर अनंतपाळ येथे कडकडीत बंद ठेवून सर्व पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्या समवेत व सर्व पक्षीय नेते तसेच शिरूर अनंतपाळ तालुक्यातील सर्व ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

**– ॲड. संभाजी पाटील शिरूरअनंतपाळ**

## शोकसंदेश



महाराष्ट्राने दूरदृष्टी व कणखर नेतृत्व असलेला नेता गमावला. विकासाच्या कामात कुठेही तडजोड न करता ग्रामीण भागाची नाडी असलेले अजित पवार हे एक रांगडे व्यक्तिमत्त्व होते ग्रामीण भागापासून शहरी भागातल्या समस्यापर्यंत व त्यावर करायच्या उपाययोजने विषयीची उत्कृष्ट माहिती असलेले नेतृत्व म्हणजे अजित दादा त्यांच्या अकाली जाण्याने सर्वांना धक्का बसला त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

**–विठ्ठल पाटील, शिरूर अनंतपाळ राष्ट्रवादी**
**काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष**

---

महाराष्ट्र राज्याचे निडर वृत्ती लाभलेले २४ तास कार्य तत्पर असलेले कर्तबगार उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार साहेब यांच्या बारामती येथील विमान दुर्घटना मधील निधनाचे वृत्त दु:खद व खेदजनक आहे... महाराष्ट्राच्या विकासाचा ध्यास घेऊन अहोरात्र काम करणारे एक धडाडीचे अभ्यासु नेतृत्व आज काळाने आपल्यातुन हिरावून नेले.दलेला शब्द पाळणारा नेता अशी त्यांची ख्याती होती. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक विकासाचा आधारवड कोसळला आहे.. ही कधीही भरुन न निघणारी पोकळी केवळ राजकीय नसून प्रत्येक सामान्य कार्यकर्त्याच्या मनातील आहे ईश्वर अजित दादांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच प्रार्थना...



**–श्री. सुधीर लखनगावे.**
**काँग्रेस नगरसेवक, शिरुर अनंतपाळ**

# महाराष्ट्र महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन व वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. ३० जानेवारी :** महाराष्ट्र महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन व वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले.

महाराष्ट्र महाविद्यालयात सकाळ सत्रात प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण पृथ्वीराज विजय पाटील निलंगेकर यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी श्री अशोक पाटील निलंगेकर, महाराष्ट्र औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भागवत पौळ, महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कर्मवीर कदम यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्राचार्य डॉ.कर्मवीर कदम यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले, ते म्हणाले की, लोकशाहीचे रक्षण करणारे व सर्वांना मूलभूत हक्क प्रदान करणारी पायाभूत चौकट म्हणजे संविधान होय. त्यामुळे आजच्या तरुणांनी लोकशाहीचे पावित्र्य जतन करावे. सर्व शाखेतील विद्यार्थ्यांचा गणवेशातील सहभाग, राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी केलेली रोमहर्षक कवायत, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा अभूतपूर्व सहभाग यामुळे हा कार्यक्रम नेत्रदीपक ठरला. संस्थेचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर ,विद्यार्थी, पालक व निलंगा परिसरातून अशा अभूतपूर्व कार्यक्रमाचे कौतुक केले जात आहे.या कार्यक्रमानंतर वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पार पडले. या प्रसंगी सुप्रसिद्ध वक्ते कथा व कादंबरीकार डॉ. संजय कळमकर म्हणाले की,आज जग फार वेगाने बदलत चालले आहे जे दिसते त्याला आदर्श मानण्याची संस्कृती वाढत आहे, ज्यांच्याकडून काही ज्ञान मिळेल त्याला आदर्श मानले पाहिजे, मित्र-मैत्रिणी समाज आपल्याला फसवेल परंतु आपले आई-वडील आपल्याला कधीच फसवणार नाहीत, हे तरुण पिढीने लक्षात घ्यावे. प्रत्येकात क्षमता आहे.आपल्यात असणारी ही सुक्ष्म क्षमता संकटात आणि संधीत वापरा. आजच्या आभासी जगात न राहता, वावरता जे वास्तव आहे त्या वास्तवाला भिडण्याची ताकद तुमच्यामध्ये निर्माण झाली पाहिजे. ते पुढे म्हणाले की मोबाईल मुळे संवाद तर बंद झालाच आहे पण त्याच बरोबर कुटुंबातील संवाद सुद्धा संपलेला आहे. आज घरातील टी.व्ही.वरील पात्रे बोलतात पण घरातील पात्रे म्हणजे आई, वडील, भाऊ, बहीण हे मात्र बोलताना दिसत नाहीत. हे कुठेतरी थांबले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणाऱ्या या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री विजय शिवराजीराव पाटील निलंगेकर, सचिव श्री.बब्रुवानजी सरतापे यांनी शुभेच्छा संदेश दिला. उद्घाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम होते. आपल्या समारोपीय भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना हसत खेळत ज्ञान घेऊन स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेण्याचा सल्ला दिला.

विचारमंचावर उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, प्रा. प्रशांत गायकवाड, विद्यार्थी संसदेची सचिव कु.मोनिका सोमवंशी, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. हंसराज भोसले, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. ज्ञानेश्र्वर चौधरी, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक, क्रीडा विभागाचे प्रमुख तसेच विद्यार्थी संसदेचे सर्व विद्यार्थी प्रतिनिधींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नरेश पिनमकर, प्रा. संदीप सूर्यवंशी यांनी केले तर आभार डॉ. ज्ञानेश्र्वर चौधरी यांनी मानले.

# उदयगिरीत हुतात्मा दिनानिमित्त महात्मा गांधी व अजित पवार यांना श्रद्धांजली





**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. ३० जानेवारी :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात हुतात्मा दिनाचे औचित्य साधून महात्मा गांधी तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी आणि अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दोन मिनिटे मौन पाळून करण्यात आली. यावेळी सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्रा. लांडगे सिद्धेश्र्वर यांनी बोलताना, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील बलिदानांची आठवण करून देत विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्याचा संदेश दिला.

या प्रसंगी बसवराज पाटील नागराळकर यांनी आपल्या मनोगतातून महात्मा गांधी यांच्या अहिंसा, सत्य व शांततेच्या विचारांचे महत्त्व पटवून सांगितले. समाजकारण व लोकसेवेतील योगदानाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचाही उल्लेख करून त्यांना आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमास महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सहसचिव, प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे, प्राचार्य आर. के. मस्के, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेनगाव नगर पंचायतीच्या घरकुल विभागाला भीषण आग

## एन ए, ले आऊटसह इतर मुळ कागदपत्रे जळून खाक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**



सेनगाव नगरपंचायतीच्या घरकुल विभागात शुक्रवार, दि. ३० रोजी सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत प्रधानमंत्री रमाई आवास योजना, शबरी आवास योजना तसेच इतर घरकुल योजनांच्या महत्त्वाच्या संचिका व लेआउट फाइल्स यासह इतर महत्त्वाचे दस्तावेज जळून खाक झाल्याने प्रथमदर्शनी दिसून आले असून यामध्ये मोठे नुकसान झाले असल्याचे नागरिकातून बोलल्या जात आहे.

नगरपंचायतीच्या घरकुल विभागात विविध घरकुल योजनांसाठी स्वतंत्र कक्ष असून, याच कक्षात ठेवलेल्या कागदपत्रांना आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच नगरपंचायतीचे कर्मचारी व स्वच्छता कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत शर्तीचे प्रयत्न करून आग विझवण्यास सुरुवात केली. काही वेळातच आग आटोक्यात आणण्यात यश आले. दरम्यान अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते; मात्र त्यांच्या येण्यापूर्वीच आग नियंत्रणात आली होती. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, आग लागल्यानंतर ती तात्काळ विझवण्यात आल्याने मोठा अनर्थ टळल्याची चर्चा नगरपंचायत व शहरात सुरू आहे. सेनगाव नगरपंचायतीच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच अशा प्रकारची आग लागण्याची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेबाबत सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रभारी मुख्याधिकारी योगेश मीना यांनी सेनगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पुढील तपास सुरू आहे. आगीत नेमके किती नुकसान झाले, कोणत्या संचिका पूर्णतः जळाल्या याचा पंचनामा करून सविस्तर अहवाल तयार केला जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

आज सेनगाव नगरपंचायत मधील घरकुल विभागाला अचानक आग लागल्याची घटना घडली असून ही आग प्रथम दर्शनी शॉट सर्किट मुळे लागली असल्याचा अंदाज दिसतोय परंतु या घटनेचा गांभीर्य लक्षात घेता संपूर्ण घटनेची पोलीस प्रशासनासह विद्युत वितरण विभागा अंतर्गत सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून त्यामध्ये कोणीही दोषी आढळल्यास कदापि गय केली जाणार नाही त्यावर निश्चित कारवाई होईल अशी गवाही सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रभारी मुख्याधिकारी योगेश मीना यांनी दिली. नगरपंचायत कार्यालयात कार्यालित असलेले सीसीटीव्ही फुटेज व इतर बाजूची सखोल निरीक्षण करून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व पोलीस अधीक्षक डॉ. नीलभा रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली सदर घटनेची सखल चौकशी केली जाणार असून मी केवळ २२ फेब्रुवारी पर्यंत माझ्याकडे नगरपंचायतचे मुख्याधिकारी या पदाचा पदभार असून या कार्यकाळात सदर घटनेची सखोल चौकशी करून वरिष्ठाकडे अहवाल सादर करणार असून यामध्ये दोषी आढळणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कठोर कारवाई निश्चित होणार असल्याची माहीती सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रभारी मुख्याधिकारी योगेश मीना यांनी व्यक्त केला आहे.

# कर्तव्यदक्ष, कामाला प्राधान्य देणारा नेता हरवला- आ. मुटकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

अतिशय कर्तव्यदक्ष, कामाला प्राधान्य देणारा आणि कार्यकर्त्यांवर जीवापाड प्रेम करणारा नेता हरवला आहे असे भावपूर्ण उद्गार भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी व्यक्त केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर व्यापारी महासंघाच्यावतीने गुरूवारी शहरामध्ये एका विशेष शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि व्यापाऱ्यांनी एकत्र येत श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी बोलतांना आ. मुटकुळे म्हणाले की, अजितदादा यांची काम करण्याची पध्दती अत्यंत वाखाणण्याजोगी होती. प्रशासनावर त्यांची चांगलीच पकड होती. त्यांनी राज्याच्या विकासासाठी आणि कार्यकर्त्यांसाठी नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली. यावेळी माजी खा ॲड शिवाजीराव माने, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी स्व अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांचे अनुभव कथन केले.

या शोकसभेला हिंगोली जिल्ह्यातील दिग्गज राजकीय नेत्यांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, जगजितराज खुराना उपनगराध्यक्ष मामूद बागवान, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, व्यापारी आणि पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

व्यापारी महासंघाच्या या आवाहनाला प्रतिसाद देत शहरातील व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुनीर पटेल, दिवाकर माने, नगरसेवक निहाल भैया, कय्युम, सुखदेव बलखंडे, हमीद प्यारेवाले, नंदकिशोर तोष्णीवाल, अनिल नेनवाणी, व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष सुमित चौधरी, मनोज आखरे, काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष मिलिंद उबाळे, प्रशांत सोनी, डॉ.सतिश पाचपुते, रमेशचंद्र बगडीया, गजेंद्र बियाणी, जावेद राज, विलास गोरे, रजनी पाटील, अल्का लोखंडे, माया सुर्यवंशी, आनंदराव शिखरे, प्रमोद मुंदडा, संचित गुंडेवार यांसह अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला.

# तलाठी व सहायक कृषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**



जुलै-ऑगस्ट २०२५ मध्ये अतिवृष्टी व महापुरामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी महसूल अधिकारी, कृषी सहायक अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांच्या संयुक्त पथकाने करण्याचे आदेश राज्य सरकारने काढले परंतु तहसीलदारांनी केवळ ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याचे आदेश काढले. वास्तविक तलाठ्याकडे रेकॉर्ड असते आणि कृषी सहायकाकडे तांत्रिक ज्ञान असते. ग्रामपंचायत अधिकारी त्यांना मदतीसाठी असतात. जिल्ह्याती इतर तालुक्यात शासनाच्या आदेशानुसार संयुक्त पंचनामे करण्यात आले परंतु कळमनुरी तालुक्यात तहसीलदारांनी चुकीचे आदेश काढीत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना स्वतंत्र पंचनामे करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी पंचनामे केले परंतु ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना चुकीचे पंचनामे केल्याबद्दल त्यांच्यावरच खापर फोडून संबंधीत रक्कम शासन खाती भरा अशा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. हे अन्यायकारक आहे. या नोटीसी मागे घेवून तलाठी व कृषी सहायकावर कारवाई करावी तसेच वाढीव रक्कम दिल्या गेली आहे. ती तलाठी व कृषी सहायकाकडून वसूल करावी व शासन खाती जमा करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटनेच्यावतीने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर शिवशंकर गुठ्ठे, भारत शिंदे, गोविंद दुधाटे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**हिंगोली- राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना औंढा नागनाथ येथे सर्व पक्षीय नेत्यांनी श्रध्दांजली अर्पण केली. यावेळी आ. संतोष बांगर, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष मुनीर पटेल, भाजपचे तेजकुमार झांजरी, उपाध्यक्ष अंकुश आहेर, मनिष आखरे, संजय दराडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. छाया- दत्तात्रय शेगुकर**

## संक्षिप्त वृत्त

### निशाणा येथे रविवारी खंडोबा यात्रा, मनोज जरांगे यांच्याहस्ते होणार महापूजा



हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील निशाणा येथे १ फेब्रुवारी रोजी खंडोबा यात्रेचे आयोजन करण्यात आले असून मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते सकाळी महापुजा पार पडणार आहे. यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.१५ वाजता अभिषेक, महापुजा व महाआरती होणार आहे. सकाळी १० वाजल्यापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ७ ते ९ लहाडीचा कार्यक्रम, रात्री १० वाजल्यापासून जागरणाचा कार्यक्रम होणार आहे तर २ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता काठीचा भंडारा होणार आहे. तसेच ३ फेब्रुवारी रोजी कुस्त्यांची दंगल होणार आहे. १ फेब्रुवारी रोजी यात्रेनिमित्त मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते महापुजा पार पडणार आहे. त्यासाठी गावकऱ्यांच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविकांनी कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन निशाणा येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### अनुसूचीत जमाती विद्यार्थ्यांसाठी योजना

हिंगोली- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी नंतर नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थांच्या सहाय्याने अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांसाठी (नीट/सीईटी/जेईई) मार्गदर्शन देण्यासाठी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता विशेष योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील खाजगी तसेच मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेले अनुसूचित जमातीचे विद्यार्थी मार्च २०२६ मध्ये इयत्ता १० वीच्या परीक्षेस बसलेले आहेत आणि नीट, सीईटी किंवा जेईई परीक्षेसाठी इच्छुक आहेत, अशा विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यात आवेदन पत्र भरावे. सदर भरलेली आवेदन पत्रे दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संबंधित प्रकल्प कार्यालयात जमा करावीत, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी, जि. हिंगोली यांनी केले आहे.

### २६ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २६ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी जिल्ह्यात कार्यवाही करीत त्यांच्याकडून २५ हजार ४०० रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच जुगार कायद्यांतर्गत पोलिसांनी तीन ठिकाणी छापे मारून ४१ हजार ७८० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त हुतात्म्यांना श्रध्दांजली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि हुतात्मा दिनानिमित्त देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आणि आदर व्यक्त करण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी-कर्मचारी यांनी मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहिली.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांच्यासह प्रशासकीय इमारतीतील विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# महाशिवरात्री यात्रेच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**



महाशिवरात्रीनिमित्त येत्या १५ फेब्रुवारी रोजी हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथे ८ वे ज्योतिर्लिंग श्रीक्षेत्र औंढा नागनाथची यात्रा आयोजित करण्यात येणार आहे. या यात्रेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने, औंढा नागनाथचे तहसीलदार हरीश गाडे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी भाकरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

महाशिवरात्री यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. यात्रेदरम्यान पार्किंग व्यवस्था, स्वच्छता, पब्लिक ॲड्रेस सिस्टीम, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालये, रुग्णवाहिका, आरोग्य पथके, निवास व्यवस्था, अग्निशमन व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे, दर्शनासाठी स्क्रिनिंग व्यवस्था तसेच रस्त्यावरील खड्डे बुजविणे आदी बाबींचा समावेश असलेला मंदिर सुरक्षा आराखडा तयार करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

यात्रेच्या कालावधीत भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता सर्व संबंधित यंत्रणांनी घ्यावी, असेही जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी बैठकीत स्पष्ट केले.

# कापीमुक्त परीक्षेसाठी कडक उपाययोजना करा- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा दक्षता समितीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, शिक्षणाधिकारी संदीपकुमार सोनटक्के यांच्यासह पोलीस विभाग, महावितरण, डायट व इतर विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

परीक्षा निर्भय व कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी भरारी पथक व बैठे पथक नियुक्त करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या. प्रत्येक परीक्षा केंद्रासाठी केंद्रनिहाय नोडल अधिकारी नेमावेत तसेच पर्यवेक्षक व समवेक्षकांची नियुक्ती करावी. बैठे पथकात नायब तहसीलदार व विस्तार अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. प्रत्येक परीक्षा केंद्रावर एक महिला व एक पुरुष पोलीस कर्मचारी, तर संवेदनशील केंद्रांवर दोन महिला व दोन पुरुष पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी, असेही त्यांनी सांगितले.

गणित, विज्ञान व इंग्रजी विषयांच्या प्रश्नपत्रिकांवर विशेष लक्ष ठेवण्यासाठी भरारी व बैठे पथकांनी दक्षता घ्यावी. प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. कोणत्याही परीक्षा केंद्रावर कॉपी प्रकार आढळून आल्यास संबंधित संस्थेची मान्यता रद्द करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला.

यावेळी शिक्षणाधिकारी संदीपकुमार सोनटक्के यांनी माहिती देताना सांगितले की, इयत्ता दहावीची परीक्षा दिनांक २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार असून जिल्ह्यातील ५४ परीक्षा केंद्रांवर १६ हजार ६८७ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यापैकी ४ परीक्षा केंद्रे संवेदनशील आहेत. इयत्ता बारावीची परीक्षा दिनांक १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार असून ३९ परीक्षा केंद्रांवर १५ हजार २४१ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यामध्ये ७ परीक्षा केंद्रे संवेदनशील आहेत. दहावीच्या ५४ व बारावीच्या ३९ अशा सर्व परीक्षा केंद्रांवर प्रत्येकी एक बैठे पथक नियुक्त करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयावरून उड्या मारून जीवन संपवू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**



हिंगोली जिल्ह्यांमध्ये मागील काही महिन्यांपासून सेनगाव पंचायत समितीमध्ये नरेगाच्या रोजगार हमी योजनेच्या कामांना मंजुरी मिळत नसल्यामुळे शेतमजूर, कामगार तसेच लाभार्थीचे हाल होत आहेत. तत्काळ हमीच्या कामांना मंजुरी द्या अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयावरून उड्या मारून जीवन संपवण्याचा इशारा क्रांतीकारी शेतकरी संघटनेने निवेदनाद्वारे दिला आहे.

पंचायत समिती प्रशासनाने रोजगार हमीच्या नवीन कामांना मंजुरी नसल्याची पंचायत समिती सेनगाव यांच्यावतीने सांगण्यात येत आहे पूर्वीची प्रलंबित कामे जोपर्यंत मार्गी लागणार नाहीत तोपर्यंत नवीन कामांना आम्ही मंजुरी देणार नाही असे सांगण्यात येत आहे यामुळे नवीन वर्ष चालू झाले असताना सुद्धा कामे बंद असल्याने शेतकऱ्यांनी विहिरीची व गाय गोठाची कामे करायची कधी व याची मस्टर काढायचे कधी असा प्रश्न निर्माण झाला आहे याकरिता क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने निवेदन देऊन रोजगार हमीची सिंचन विहिरी, गाय गोठा यासह इतर कामे तत्काळ मार्गी लावावी अन्यथा आम्हाला जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातवरून उड्या मारून जीवन संपवावे लागेल असा इशारा देण्यात आला. या निवेदनावर गजानन कावरखे, नामदेव पतंगे, प्रवीण पाटील, अमोल एकशिंगे, नारायण काळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बाराशे रुपयांसाठी मुख्याध्यापिकेसह दोन शिक्षक अडकले लाच लुचपतच्या जाळ्यात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० जानेवारी-**

पगाराचे विवरण देण्यासाठी एक हजार दोनशे रुपयांची लाच घेणाऱ्या मुख्याध्यापिकेसह दोन सहशिक्षकांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली आहे.

उस्माननगर येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक व शिक्षिका असलेल्या दाम्पत्य सन २०१९ ते माहे सप्टेंबर २०२५ पर्यंत कार्यरत होते. माहे सप्टेंबर २०२५ मध्ये या दोघांची उस्माननगर येथून बदली झाली. आयकर रिटन भरण्यासाठी सन २०२४-२५ चे पगाराचे वितरण पत्र लागत असल्याने तक्रारदाराने उस्माननगर शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या वांगे यांना पगाराचे विवरण पत्र देण्याची मागणी केल्यानंतर विद्या वांगे यांनी त्यांच्याकडे प्रत्येकी सहाशे रुपये प्रमाणे बाराशे रुपयांची मागणी केली. तक्रारदाराने लाच मागणीची पडताळणी केल्यानंतर मुख्याध्यापिका विद्या वांगे, सहशिक्षक रामेश्वर पांडागळे व गौतम सोनकांबळे यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने लाचलुचपत विभागाने सापळा रचून बाराशे रुपये रक्कम स्विकारताना सहशिक्षक रामेश्वर पांडागळे यांना रंगेहात पकडले. या प्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात मुख्याध्यापिका विद्या वांगे यांच्याविरुध्द दोन सहशिक्षकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**जात वैधता प्रमाणपत्रासाठी २५ हजार घेणाऱ्यास अटक**

जात वैधता प्रमाणपत्र काढून देण्यासाठी २५ हजाराची लाच घेणाऱ्या खाजगी इसम साहेबराव नागोराव गुंडीले यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली असून, त्याच्याविरुध्द विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या दोन्ही मुलीचे कुणबी मराठा जातीचे वैधता प्रमाणपत्र काढण्यासाठी फाईल दाखल करण्यात आली होती. यासाठी साई झेरॉक्स सेंटर येथील साहेबराव नागोराव गुंडीले यांनी जात वैधता समिती कार्यालयात ओळख असून तुमचे काम करुन देतो असे सांगत प्रत्येकी ३० हजार रुपये आणि दोन काढायचे असतील तर ५० हजार रुपयांची लाच मागितली. तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्यानंतर दि.२९ जानेवारी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तक्रारीची पडताळणी केली. त्यांनी साई झेरॉक्स सेंटरवर भेट देवून जात वैधता प्रमाणपत्र काढायचे आहे असे सांगितले. यासाठी आरोपी साहेबराव गुंडीले याने २५ हजार लाचेची मागणी केली. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचून २५ हजारांची रक्कम स्विकारताना साहेबराव गुंडीले यास रंगेहात पकडले. आरोपीची अंगझडती घेतली असता एक मोबाईल, आधारकार्ड, मतदान कार्ड आढळून आले. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे यांच्या पथकाने केली तर पोलीस निरीक्षक माधुरी यावलीकर या पुढील तपास करीत आहेत.

# स्व.अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आज सर्व पक्षीय शोक सभा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० जानेवारी-**



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे अकाली निधन झाले. त्यांना सर्व पक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शनिवार ३१ जानेवारी २०२६ रोजी आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, पदाधिकारी व स्व.अजित दादांवर प्रेम करणाऱ्या जनतेनी उपस्थित रहावे, असे आवाहन सर्व पक्षीय शहर जिल्हाध्यक्षांनी संयुक्तरित्या प्रसिद्ध पत्रकाद्वारे आवाहन केले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे बुधवार दि.२८ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता बारामती विमानतळावर त्यांचे विमान अपघातात अकाली निधन झाले. दि.२९ जानेवारी रोजी शासकीय इतमामात बारामती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व.अजितदादा यांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्राची फार मोठी हानी झाली असून महाराष्ट्र कामाचा माणूस असलेल्या दादाला गमावला आहे.

नांदेड जिल्ह्यातील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींनी स्व.अजित दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि.३१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सर्व पक्षीय आदरांजली सभेचे आयोजन कै.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, श्री गुरुगोविंदसिंघ जी स्टेडियमजवळ, नांदेड येथे करण्यात आले आहे. तरी सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्व.अजित दादांवर प्रेम करणाऱ्या जनतेनी दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे (शहर) जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, भाजपचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष अडवोकेट किशोर देशमुख, भाजपाचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे (श.प.) शहराध्यक्ष डॉ.सुनिल कदम, कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अब्दुल सत्तार, शिंदे गट शिवसेनेचे महानगरप्रमुख राजू गुंडावार, ठाकरे शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रकाश मारावार, मनोज यादव, वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष इंजि.प्रशांत इंगोले, एम.आय.एम.चे जिल्हाध्यक्ष अमजेद बेग, मनसेचे जिल्हाध्यक्ष स.मॅन्टीसिंघ यांनी केले आहे.

## शिळवणी येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रदान

**देगलूर** -तालुक्यातील शिळवणी येथे ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेचे आयोजन रिपब्लिकन सेनेचे तालुका उपाध्यक्ष नितेश सुर्यवंशी यांनी केले. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी म्हणून रिपब्लिकन सेनेचे तालुका उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते नितेश सदाशिव सुर्यवंशी यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन दि २४ जानेवारी रोजी केले होते. या स्पर्धेत जि.प.प्रा. शाळा शिळवणी व कै. व्यंकटराव देशमुख माध्यमिक विद्यालयात शिळवणी येथील तब्बल १६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटात घेण्यात आली. आज प्रजासत्ताक दिनानिमित्त स्पर्धा परीक्षेतील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेत प्राथमिक गटात प्रथम अक्षरा मनोज देवकत्ते, द्वितीय आरती सतिश सुर्यवंशी, तृतीय अर्पिता विशाल राठोड, आणि उत्तेजनार्थ सुरज गजानन घोडेकर तर माध्यमिक गटातून प्रथम निखिल बंडू राठोड, द्वितीय संजिवनी ज्ञानोबा भुताळे, तृतीय निशा प्रेमकुमार सुर्यवंशी आणि उत्तेजनार्थ किर्ती विरभद्र ढोणे, विष्णुकांत शिवाजी डोईफोडे, आदर्श सतिश सुर्यवंशी व परशुराम देवबा देवकते मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात आले तसेच विशेष पुरस्कार यश राठोड, रिहान जलाल, सोफिया कबनूरे, श्रष्टी धाईगुंडे यांना, कृतिका येडूरे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शोभाबाई गुलाबराव देशमुख होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून मनोहरराव देशमुख (माजी सरपंच), सदाशिवराव सुर्यवंशी (माजी सरपंच), संदीप देशमुख (पो. पा.), ओमप्रकाश देशमुख, ड. महेश देशमुख, अनिल राठोड (माजी उपसरपंच), मंगेश वंजे (ग्रा.प. सदस्य), सौ. शितल नितेश सूर्यवंशी (ग्राम सदस्या), नागशेट्टी अप्पा उंद्रे, कृष्णाजी देशमुख, रंजित देशमुख (मुख्याध्यापक), लवटे सर (मुख्याध्यापक), सौ. डोईफोडे (अध्यक्षा शा.व्य.स) आदीं उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेचे परीक्षण सेवानिवृत्त शिक्षक शिवाजी माने, कवी व समीक्षक ऋषिके देशमुख यांनी केले.

## सिडकोत प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध ठिकाणी ध्वजारोहण उत्साहात

**नवीन नांदेड** - सिडको हडकोसह दक्षिण परिसरात ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिनी सिडको कार्यालय नांदेड, क्षेत्रीय कार्यालय मनपा सिडकोसह शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायत कार्यालये, नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन अन्य विविध ठिकाणी ध्वजारोहण उत्साहात पार पडला. सिडकोतील मनपाचे क्षेत्रीय कार्यालय येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग यांच्या हस्ते सकाळी ७ वाजता ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी कार्यालयीन अधीक्षक विलास गजभारे, वसुली प्रवेक्षक वसंत कल्याणकर, मारोती सारंग, संजय नागापूरकर, सादुल्ला खान, स्वच्छता निरीक्षक किसन वाघमारे, यांची उपस्थिती होती, तर सिडको कार्यालय सिडको प्रकल्प नवीन नांदेड येथे सहाय्यक विकास अधिकारी कपिल व्हि. राजपूत यांच्या हस्ते सकाळी ७:४५ वाजता ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी कार्यालयाचे लेखा सहाय्यक संकेत गिरी, यांच्यासह सुरक्षारक्षक सौ.लता पोहरे, राजू धुमाळ, बळी घंटेवाड, सुनील कांबळे, साईनाथ गिरी यांची उपस्थिती होती. तसेच महात्मा फुले माध्यमिक आश्रम शाळा वाघाळा येथील संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक भगवान इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला्. तर त्याचप्रमाणे कुसुमताई माध्यमिक विद्यालय येथे संस्थेचे सचिव संभाजी बिराजदार यांच्या हस्ते ध्वजारोहणी करण्यात आला. यावेळी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.तसेच गोपाळचावडी ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी ग्रामपंचायतचे सरपंच सौ. सुरेखा प्रदीप लाखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ग्रामविकास अधिकारी प्रकाश भदरगे, उपसरपंच साहेबराव सेलुकर व सदस्यांची उपस्थिती होती. तसेच धनेगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयच्या वतीने ग्रामपंचायतीचे सरपंच पिंटू पाटील शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य व ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती. तसेच विष्णुपुरी ग्रामपंचायत च्या वतीने ग्रामपंचायत सरपंच सौ. संध्या विलास देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी सदस्य व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## प्रो. डॉ.दिलीप सावंत यांचा आज सेवापूर्ती सत्कार सोहळा



**कंधार** - श्री शिवाजी कॉलेजचे मराठी विभाग प्रमुख, माजी एनसीसी विभाग प्रमुख, प्रोफेसर डॉ.दिलीप सावंत यांचा सेवापूर्ती सत्कार व 'अस्मितेच्या पाऊलवाटा' या गौरव ग्रंथाचा प्रकाशन सोहळा शनिवार, दि.३१ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता श्री शिवाजी कॉलेज, कंधार येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार गुरुनाथराव कुरुडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी, कंधारचे अध्यक्ष प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे, सहसचिव ॲड.मुक्तेश्वर धोंडगे, उपाध्यक्ष माधवराव पेठकर, अहमदपूरच्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार, अंबाजोगाईच्या खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री शिवाजी कॉलेज, कंधारचे प्रभारी प्राचार्य डॉ.रमाकांत जोगदंड आदींसह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# बाऱ्हाळी बाजारपेठ बंद ठेवून अजितदादांना श्रद्धांजली

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. ३० जानेवारी-**



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष अजित दादा पवार यांचे विमान दुर्घटनेत दुःखद निधन झाल्याचे समजताच महाराष्ट्रातील संपूर्ण शहरासह गावे, वाडी तांड्यावर दुःखाची लाट पसरली. मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी बाजारपेठ शंभर टक्के बंद ठेवून गावकऱ्यांच्या वतीने येथील राष्ट्रीय महामार्गावर शोकसभा घेऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांच्या राजकारणातील कुशल कामगिरीबद्दल अनेकांनी आपले विचार व्यक्त करून राजकारणातील एक जनप्रिय, कणखर नेतृत्व हरवल्याची खंत व्यक्त केली. अमर रहे.... अमर रहे ....अजितदादा अमर रहे .... अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी नांदेड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राजन देशपांडे, माजी समाज कल्याण सभापती स्वप्नील चव्हाण , भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष चंद्रशेखर देशमुख, प्रतिष्ठित व्यापारी अरुण महाजन, चेअरमन व्यंकट पाटील उमाटे, तंटामुक्ती अध्यक्ष हणमंत वाडीकर, बालाजी सोमावार , अभिजीत महाजन, राजेश तोटकर, डॉ. रमेश राठोड, सुरेश सुकुनगे, साईनाथ कोटगीरे, नरसिंग अस्वले, गणेश जाधव, केशव रापतवार, संपत गायकवाड, सुभाष गवते, प्रकाश देवरे, शेख जाकीर हुसेन, आनंदा बनकर, तुकाराम वाघमारे, अंतेश्वर कोलेवाड, प्रकाश भंगे, नामदेव अवधूते, मनोज अस्वले, गोविंद रोकडे यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते.

# पांदण रस्ता मोकळा
## शेतकऱ्यांच्या मागणीला यश



**तभा वृतसेवा**
**फुलवळ, दि. ३० जानेवारी-**

शेतकऱ्यांना शेतीतील कामे करण्यास रस्त्याच्या अडचणींचा सामना करावा लागतो ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाकडून मोहीम राबवून पाणंद रस्ते मोकळे करण्यात आले, असे असले तरी काही शेतकऱ्यांनी पाणंद रस्ते बंद केल्याने इतर शेतकऱ्यांना शेतात ट्रॅक्टर व इतर साधने नेताना अडचणीचा सामना करावा लागतो. यात अनेक वेळा वाद निर्माण होतात. त्यामुळे शासनाने पाणंद रस्ते मोकळे करून द्यावे, अशी मागणी फूलवळ येथील शेतकरी होनाजी गोविंद शेळगावे आणि तेथे सर्व शेतकऱ्यांनी तहसीलदाराकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनानुसार फूलवळ येथे गट नंबर ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६ मधील अंदाजे २० हेक्टर ३४ आर शेतजमीन असून, काही शेतकऱ्यांनी पारंपरिक रस्ता बंद केला आहे. त्यामुळे खरीप हंगामाची पेरणी करण्याकरिता ट्रॅक्टर नेण्यास अडचणी निर्माण होत आहे. प्रशासनाने याकडे लक्ष देऊन सदर पांदण रस्ता मोकळा करुन द्यावा , अशी मागणी केली आहे. मागणीची दखल घेऊन फुलवळ मंडळाचे मंडळ अधिकारी एस आर शेख आणि तलाठी बालाजी केंद्रे यांनी जाय मोक्यावर येऊन या पांदण रस्त्याची पाहणी करून लवकरात लवकर हा रस्ता शेतकऱ्यांना मोकळा करून देऊ असे आश्वासन दिले आहे.

## प्रजासत्ताक दिन उत्साहात


**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २९ जानेवारी-**

बिलोली शहरात विविध कार्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांच्या हस्ते शासकीय मुख्य ध्वजारोहण संपन्न झाले. राष्ट्रगीतानंतर सर्व प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. व संविधानांचे वाचन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, उपाध्यक्ष अनूप अंकुशकर, तहसिलदार गजानन शिंदे, नायब तहसिलदार बालाजी मिठेवाड, आर.जी.चव्हाण आदीसह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हरडफ येथे उद्या धम्म मेळाव्याचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २९ जानेवारी-**



तालुक्यातील हरडफ येथे उद्या दि. १ फेब्रुवारी रोजी ५३ व्या धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रथम सत्रात सकाळी नऊ वाजता ध्वजारोहण धम्मकीर्ती महिला मंडळ यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सकाळी साडेनऊ वाजता धम्मदेसना उपासक आर. व्ही वाठोरे, उपासक गणपण वाठोरे देणार आहेत दुपारी बारा वाजता तथागत गौतम बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांच्या तैल चित्राची गावातील प्रमुख रस्त्याने भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. द्वितीय सत्र सुरू होईल सायंकाळी सात ते आठ वाजेपर्यंत यामध्ये प्रमुख उपस्थिती ॲड. डी. एफ. हरदडकर उद्योजक मारुती रामजी भगत, सामाजिक कार्यकर्त्या लताबाई मुनेश्वर इत्यादीची विशेष उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. महेंद्र नरवाडे, प्रकाश वाठोरे, प्रवीण वाठोरे हे करणार आहेत. तृतीय सत्रात यामध्ये बुद्ध भीम गीताचा जंगी मुकाबला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक सचिन नागवंशी यांचा अकोला व महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायिका अश्विनी राज ग्रुप संच मुंबई यांचा वैचारिक सामना होणार आहे. परिसरातील सर्व जनतेने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीचे अध्यक्ष विक्रांत वाठोरे, उपाध्यक्ष संदीप रायघोळ , सचिव कपिल वायवळ, सहसचिव शेषराव वाठोरे, कोषाध्यक्ष सिद्धार्थ वाठोरे, कोषाध्यक्ष माधव आढागळे, सदस्य उत्तम नरवाडे, ज्ञानेश्वर थोरात, सिद्धार्थ वाठोरे यांनी केले आहे.

# किनवट नगरपरिषदेकडून पशुपालकांवर कारवाईचा इशारा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ३० जानेवारी-**

किनवट नगरपरिषद कार्यक्षेत्रात मोकाट फिरणाऱ्या अश्ववर्गीय प्राणी (गाढव व खेचर) यांमुळे होणाऱ्या संभाव्य वाहतूक अपघातांच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषद व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले. ही बैठक गुरुवारी (दि. २९ जानेवारी २०२६) दुपारी ३.३० वाजता नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्या दालनात पार पडली.

बैठकीस नगरपरिषद मुख्याधिकारी मुगाजी काकडे, पोलीस प्रशासनाचे प्रतिनिधी पोलीस उपनिरीक्षक झाडे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव तसेच किनवट शहरातील अश्ववर्गीय प्राण्यांचे पशुपालक उपस्थित होते.

मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या वाहतूक अपघातांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नगरपरिषदेकडे प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने पशुपालकांना त्यांच्या जनावरांना रस्त्यावर मोकाट फिरू न देता कामानंतर निश्चित ठिकाणी बांधून ठेवण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच जनावरे ज्या ठिकाणी बांधून ठेवली जातील, त्या ठिकाणाची माहिती प्रशासनास देणे बंधनकारक राहील, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. यापुढे रस्त्यावर कोणतेही मोकाट गाढव किंवा खेचर आढळून आल्यास महाराष्ट्र नगरपरिषद व नगरपंचायत अधिनियम १९६५ अन्वये कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा नगरपरिषद व पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला. संबंधित पशुपालकांना आवश्यक उपाययोजना करण्यासाठी ५ फेब्रुवारी २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

बैठकीदरम्यान पशुपालकांनी मांडलेल्या सूचनांची प्रशासनाने सकारात्मक दखल घेतली. ही बैठक शांततेत व यशस्वीरीत्या पार पडली असून, किनवट शहरातील मोकाट जनावरांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पशुपालक व नगरपरिषद प्रशासनाने समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



नांदेड- विमानतळ रोडच्या सर्वांगीन विकासासाठी आसना मार्निंग वॉक ग्रुपच्या वतिने विमानतळ गार्डन चैतन्य नगर येथे विविध मागण्यासाठी आनंद कल्याणकर यांचे वतिने लाक्षणिक उपोषण करण्यात आले यावेळी खा. प्रा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, राजेश पावडे, महेश देशमुख, ॲड. सुरेंद्र घोडजकर, विठठल पावडे, बालाजी चव्हाण, स. दिपकसिंघ हुजूरीया, नागेश सुलगेकर, विक्रम ठाकूर, सत्यजित टिप्रेसवार, श्रीनिवास मोरे, केदार पाटील साळुंके, तथा परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते (छाया- करणसिह बैस)

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आमरण उपोषण मागे

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३० जानेवारी-**



शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित व जिव्हाळ्यांच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते . लोकप्रतिनिधी प्रशासनाच्या समन्वयातून सकारात्मक तोडगा काढून लेखी आश्वासन देण्यात आल्याने उपोषणकर्ते स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद पवार निवघेकर यांनी आमरण उपोषण मागे घेतले आहे .

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रमोद वेंकटराव पवार यांनी प्रजासत्ताक दिनापासून तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात आमरण उपोषण सुरू केले होते. शेतकऱ्यांच्या जनहिताच्या निगडित अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नासाठी लोकप्रतिनिधी तसेच प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आमरण उपोषणात बसले होते . यामध्ये शेतकऱ्यांना सिंगल फेजच्या माध्यमातून २४ तास वीज पुरवठा मिळावा ग्रामीण रस्त्याच्या प्रश्न मार्गी लावण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा . वन्य प्राण्यांचे नुकसान टाळण्यासाठी प्रभावी संरक्षणात्मक उपायोजना राबवाव्यात शिवपांदण रस्ते , बांध रस्ते , मोकळे करून देण्यात यावे या प्रमुख मागण्या होत्या .

चार दिवसापासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाशी दखल भोकर विधानसभा मतदार संघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी घेतली आहे . याबाबत संबंधित प्रशासनाशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत . आमदार श्रीजया चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख बारडकर , माजी सभापती लक्ष्मण जाधव यांनी आमरण उपोषणकर्त्याची भेट घेऊन चर्चा केली . नायब तहसीलदार मारोती जगताप यांनी उपोषण स्थळास भेट देऊन सकारात्मक चर्चा करत प्रश्न मार्गी लावण्याचे लेखी आश्वासन दिले आहे . आमदार श्रीजया चव्हाण यांच्या शेतकऱ्यांच्या आमरण उपोषणाची तातडीने दखल घेतल्याने प्रशासनाच्या सकारात्मक निर्णयातून अखेर उपोषण मागे घेण्यात आले आहे . यावेळी नायब तहसीलदार मारोती जगताप , निलेश देशमुख बारडकर , मारोतराव पवार , सरपंच प्रतिनिधी रमेश लखे , शामराव लखे यांच्यासह आदींची उपस्थिती होती . लोकप्रतिनिधी व प्रशासनाने समन्वयातून तोडगा काढल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे .

**आ. श्रीजया चव्हाण यांची महावितरणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा**

आमदार श्रीजया चव्हाण यानी शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू असलेल्या आमरण उपोषणाची दखल घेऊन महावितरण कंपनीशी चर्चा करून निवघा ३३ केवी उपकेंद्रा अंतर्गत सिंगल फेजिंग लाईन सुरू केली आहे . यासोबत वनविभागाअंतर्गत वन प्राण्यांमूळे झालेल्या नुकसानीच्या आर्थिक मदतीचे धनादेश तातडीने देण्याच्या सूचना वन विभागाला दिली आहे . यासोबतच पांदण रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे आमरण उपोषण तुर्त शेतकऱ्यांनी परत घेतले आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जागृती शुगर येथे उपमुख्यमंत्री अजितदादांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** राज्याचे उपमुख्य मंत्री अजितदादा पवार यांचे आकस्मिक अपघाताने निधन झाले त्याबद्दल शुक्रवारी जागृति शुगर साखर कारखाना तळेगाव तालुका देवणी येथे दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी जागृति शुगर चे जनरल मॅनेजर गणेश येवले जागृती शुगर चे मुख्य अभियंता अतुल दरेकर अस्वनी प्रमुख विलास पाटील, अक्षय सूर्यवंशी ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिराजदार डी पी जाधव जी जी जाधव यांच्यासह जागृती शुगरचे विविध खाते प्रमुख अधिकारी कर्मचारी कामगार उपस्थित होते





## विविध वृत्त...

### फेब्रुवारी महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

**लातूर :** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. परंतु, सद्यस्थितीत लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेची अंमलबजवणी सुरु असल्यामुळे ०२ फेब्रुवारी २०२६ रोजीचा लोकशाही दिन स्थगित करण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

### लातूर जिल्ह्यात १७ कृषी निविष्ठा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द

**लातूर :** रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये शेतकऱ्यांना वेळेत बियाणे, खत आणि कीटकनाशकांचा पुरवठा होण्यासाठी कृषी विभागाने कडक पावले उचलली आहेत. पुणे येथील संचालक (नियंत्रण व गुणनियंत्रण) कृषी आयुक्तालयाच्या सूचनेनुसार लातूर जिल्ह्यात भरारी पथक आणि कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) यांनी कृषी निविष्ठा केंद्रांची तपासणी केली होती. तपासणीदरम्यान काही केंद्रांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्याने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांच्या अध्यक्षतेखाली ८ जानेवारी २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत एकूण १७ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले. यामध्ये बियाणे विक्रीचे १३, खत विक्रीचे २ आणि कीटकनाशक विक्रीचे २ परवाने रद्द झाले आहेत.तसेच ८ कृषी निविष्ठा केंद्रांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.


साठाफलक व भावफलक प्रदर्शित न करणे, साठा नोंदवही आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, भावफलक, साठा नोंद अद्ययावत न ठेवणे, विक्री बिलावर शेतकऱ्यांची सही/अंगठा न घेणे, बियाण्यांचा संपूर्ण तपशील बिलात न लिहिणे, उत्पादकाचा स्त्रोत न दर्शविणे, ई-पॉस वरील खत साठा आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, खतासोबत इतर निविष्ठांची लिंकिंग करणे, परवाना असूनही दुकान बंद ठेवल्यास बियाणे अधिनियम १९६६, नियम १९६८, बियाणे नियंत्रण आदेश १९८३, खत नियंत्रण आदेश १९८५, कीटकनाशक कायदा १९६८ आणि कीटकनाशक नियम १९७१ नुसार कठोर कारवाई केली जाईल, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी स्पष्ट केले.

### महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात हुतात्मा दिन संपन्न



**लातूर :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी आज दोन मिनिट मौन (स्तब्धता) पाळून हुतात्मा दिन संपन्न झाला. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, डॉ. संजय गवई, डॉ. बसवेश्र्वर बेंद्रे, अनिल उस्तुर्गे, गोपाळ तिरुमुले, रंगनाथ लांडगे, संभाजी लातूरे, योगीराज माकणे, ओंकार बोळशेट्टे, अजय गायकवाड, गुरुप्रसाद बिराजदार आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या. तसेच महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य आणि व्यवसाय अभ्यासक्रम द्वारा सुद्धा सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग दर्शविला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि जलील सय्यद यांनी परिश्रम घेतले.

### बाजार समितीत अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण



**लातूर :** महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे काल दि. २८/०१/२०२६ रोजी विमान अपघातात दु:खद निधन झाले. त्याबद्दल २९ जानेवारी रोजी लातुर येथील कृषि बाजार समितीच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी उपस्थित संचालक सर्वश्री अनिल पाटील, आनंद पाटील, सचिन सुर्यवंशी, शिवाजी देशमुख, पवनराज देशमुख प्रभारी सचिव अरविंद पाटील, सहा. सचिव सतिश भोसले, दिपक पाटील, बालाजी किसवे अजय गंभीरे सचिन गायकवाड आदी कर्मचारी वृंद उपस्तीत होते

# अन्नधान्यात देश स्वयंपूर्ण, आता 'पोषण सुरक्षा' हेच खरे आव्हान!

## माजी कुलगुरू डॉ. अशोक धवन; दयानंद विज्ञान महाविद्यालयात 'वनस्पती ऊतक संवर्धन' विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** - १९६०-७० च्या दशकात अन्नटंचाईशी झुंजणाऱ्या भारताने आज अन्नधान्य उत्पादनात मोठी झेप घेतली आहे. देशात अन्नाची रास वाढली असली, तरी त्यातील 'सत्त्व' म्हणजेच पौष्टिकता टिकवणे आणि देशाची 'पोषण सुरक्षा' (Nutritional Security) बळकट करणे हेच कृषी आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्रापुढील आताचे सर्वात मोठे आव्हान आहे, असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक धवन यांनी केले.

येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने दि.२९ जानेवारी २०२६ रोजी वनस्पती ऊतक संवर्धन: आव्हाने, उपाय व भविष्यकालीन संधी या विषयावर आयोजित राज्यस्तरीय



कार्यशाळेत ते मुख्य वक्ते म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद एज्युकेशन सोसायटीचे अकॅडमिक डेव्हलपमेंट ऑफिसर डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,आयक्यूएसी समन्वयक डॉ. जे.ए.अंगुलवार, सूक्ष्मजीवशास्त्र प्रमुख डॉ. आर. ए. मोरे आणि जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख प्रा. ए.ए.बिडकर यांची उपस्थिती होती.

देशाच्या कृषी प्रवासाचा आढावा घेताना डॉ. धवन म्हणाले की, कृषी विद्यापीठे आणि आयसीएआर (ICAR) च्या अथक संशोधनामुळे आपण आज अन्न अधिशेष (Food Surplus) देश बनलो आहोत.कोरोना काळात ८० कोटी जनतेला मोफत अन्न पुरवणे हे याचेच द्योतक आहे.मात्र, केवळ पोट भरणे पुरेसे नसून, शरीराच्या पोषणाची गरज भागवणे भविष्यात महत्त्वाचे ठरेल.यासाठी जैवतंत्रज्ञानात नवनवीन संशोधनाची गरज आहे.

संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड यांनी 'प्लँट टिश्यू कल्चर'ला जैवतंत्रज्ञानातील एक क्रांतिकारी क्षेत्र मानले आहे.ते म्हणाले, हे तंत्रज्ञान केवळ रोगमुक्त आणि अधिक पौष्टिक पिके विकसित करण्यासाठीच नव्हे, तर लुप्त होणाऱ्या वनस्पतींच्या प्रजाती वाचवण्यासाठीही वरदान आहे.कमी वेळेत उच्च दर्जाचे उत्पादन देण्याची क्षमता असल्याने, जागतिक अन्नटंचाईवर मात करण्यासाठी हा एक प्रभावी उपाय ठरेल,असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

दुसऱ्या सत्रात मार्गदर्शन करताना विलासराव देशमुख कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय लातूर येथील डॉ. राहुल चव्हाण यांनी 'टिश्यू कल्चर'चे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, रोगमुक्त आणि उच्च दर्जाची रोपे तयार करण्यासाठी ही पद्धत वरदान आहे. प्रयोगशाळेतील दुषितता (Contamination) रोखणे आणि कुशल मनुष्यबळ तयार करणे ही या क्षेत्रातील आव्हाने असली, तरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्यावर मात करणे शक्य आहे.

आपल्या यशाची गाथा मांडताना जी मार्ट नर्सरी नांदेडचे उद्योजक आणि संस्थापक शिवाजी सुपारे म्हणाले की, ग्रामीण भागातील तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न धावता शेतीपूरक उद्योगांकडे वळावे. कमी भांडवलात टिश्यू कल्चर आणि नर्सरी व्यवसाय उभारून, चिकाटीच्या जोरावर कोट्यवधींची उलाढाल करणे शक्य आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. अवंती बिडकर यांनी केले. सूत्रसंचलन विद्यार्थिनी पर्णवी ढवारे हिने केले, तर आभार प्रा. डॉ. फिरदौस बिरादार यांनी मानले.या चर्चासत्रासाठी राज्यभरातून संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महिला सक्षमीकरणाची चळवळ समाजात तळागळापर्यंत पोहचणे गरजेचे : प्रा.डॉ.कुसुम ढोणे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** महिला सक्षमीकरण ही आजच्या काळाची गरज असून महिलांचे सक्षमीकरण करण्याकरिता आपल्या देशात महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी शिक्षणाची दारे खुले करून महिला सक्षमीकरणाचा पाया रचला.भारतीय संविधानाने राजकीय,सामाजिक,शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रात पुरुष आणि महिलांना समान संधी आणि अधिकार दिलेले आहेत. त्या अधिकाराविषयी समाजातील तळागाळातील महिलांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन प्रा.डॉ.कुसुम ढोणे यांनी केले. त्या लातूर येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयाच्या वतीने मौजे सेलू ता. औसा येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराप्रसंगी प्रमुख व्याख्यात्या म्हणून बोलत होत्या.

याप्रसंगी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. सुनील पुरी, सौ.पूजा पंडगे,श्री.तुकाराम पवार,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बालाजी शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना डॉ.सुनील पुरी म्हणाले की, देशात महिलांचे स्थान व स्थिती पाहून तुम्ही देशाची स्थिती सांगू शकता. राष्ट्राची प्रत्येक क्षेत्रात प्रगती साधायची असेल तर महिला सक्षमीकरण अत्यावश्यक आहे.महिला सक्षमीकरणासाठी समाज, देश आणि महिलांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.श्रीमंत दोरवे यांनी केले,सूत्रसंचालन प्रा.रवि चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. वसंत बंडे यांनी मानले.

### चन्नबसवेश्वर फार्मसीचे भातांगळी येथे रा.से.यो. विशेष शिबीर कार्यक्रमाचे उद्‌घाटन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री) यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भातांगळी (ता. लातूर) येथे दि. २७ जानेवारी २०२६ रोजी ''शाश्वत विकासासाठी युवक जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसदभूमी विकास'' याशीर्षकाखाली वार्षिक विशेष शिबीर कार्यक्रमाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून गावचे आदर्श सरपंच मा. श्री. परमेश्वर पाटील, मुख्याध्यापक श्री. किशोर गायकवाड, मुख्याध्यापक श्री. उत्तम दुरवे, प्र. प्राचार्य डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, ग्रामपंचायत सदस्य श्री. दिलीप मुक्ता, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. भिमाशंकर हुच्चे, प्रा. महेश मानके, अविनाश मठपती, प्रा. बालाजी अजगुंडे, डॉ. ऐश्वर्या ईरापल्ले, श्री. रोहित भरती, श्री सुखराज गरगट्टे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता.

उद्धाटनानंतर रा.से.यो. विशेष शिबिराच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. शिबिराअंतर्गत स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, आरोग्य व स्वच्छतेबाबत जनजागृती, पाणी बचत अभियान, व्यसनमुक्ती जनजागृती, तसेच प्राथमिक आरोग्य तपासणी अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## जनतेला समर्पित नेतृत्व गमावले - अजित पाटील कव्हेकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** मातीशी नाळ जोडलेला आणि कार्यकर्त्यांना सदैव उपलब्ध होणारे राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांनी कायम राज्याच्या हिताचा आणि विकासाचा ध्यास घेतला होता. खऱ्या अर्थाने जनतेला समर्पित असणारे नेतृत्व आपण गमावले असल्याचे सांगून त्यांच्या सारखा नेता पुन्हा होणे नाही अशा शब्दात लातूर भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

लातूर येथील शहर जिल्हा भाजपाच्या कार्यालयात उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष अजित कव्हेकर पाटील बोलत होते. यावेळी माजी शहर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक देविदास काळे, सरचिटणीस संजय गीर, प्रविण कस्तुरे, मंडल अध्यक्ष रोहित पाटील, राहुल भुतडा, सचिन सुरवसे, ॲड. प्रदिप मोरे आदींची उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार हे लोकनेते असल्याचे सांगून त्यांचा तळागाळापर्यंत जनसंपर्क होता. असे अजित पाटील कव्हेकर म्हणाले. अजित दादा पवार यांचे अपघाती निधन सर्वांसाठी धक्कादायक व दुखदायक असून त्यांच्या जाण्याने राज्याची मोठी हानी झाली आहे. अहोरात्र जनतेसाठी झटणारे कर्तव्यदक्ष नेता म्हणून ओळख असणारे अजित पवार तितकेच स्पष्टवक्ते व परखड होते. रोखठोक भूमिका मांडताना त्यांनी संवेदनशीलपणा जपलेला होता. जनतेसह कार्यकर्त्यांशी थेट संपर्क असणारे दादा राज्याच्या विकासासाठी अग्रेसर राहिलेले होते. प्रशासनावरील पकड व अधिकारी वर्गात असणारा त्यांचा दरारा त्यांच्या कार्यकुशलतेचा सातत्याने साक्षी देणारा होता. राजकारणा पलीकडे जाऊन



अनेकांशी त्यांनी आपले संबध जपलेले होते. त्यामुळे त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकाला अजित पवार आपल्या कुटुंबाचे भाग आहेत असेच वाटत होते. त्यांच्या अकाली निधनाने राज्याचीच नव्हे तर देशाची हानी झालेली असून हि पोकळी भरून निघणे अशक्य असल्याचे अजित पाटील कव्हेकर म्हणाले.

या श्रद्धांजलीस नगरसेवक विनय जाकते, ऋषिकेश राजे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष तथा नगरसेविका शितल मालू, शोभा पाटील, राजश्री धोत्रे, अविनाश कोळी, ज्योतिराम चिवडे, सतीश मिरचे, विजय अवचारे, युवा मोर्चा अध्यक्ष ओम धरणे, धनंजय हाके, नितीन कोरे, संतोष पांचाळ, संतोष तिवारी, पवन आल्टे, नय्युम शेख, अक्षय स्वामी, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानववादाचे प्रणेतेः डॉ. मकरंद गिरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** पंडित दीनदयाळ उपाध्याय हे लेखक, पत्रकार आणि भारतीय जनसंघाचे नेते होते. मथुरेत जन्मलेल्या दीनदयाळांनी साधे जीवन जगून देशासाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी समाजातील शेवटच्या घटकाचा अंत्योदय विचार मांडला आणि एकात्म मानवतावाद ही विचारधारा दिली, जी भारतीय संस्कृतीवर आधारित आहे. ते

एकात्म मानववादाचे प्रणेते आहेत असे विचार डॉ. मकरंद गिरी यांनी मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचलित श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालयाच्या मौजे खोपेगाव ता. जिल्हा लातूर येथे आयोजित प्राचार्य डॉ. आशा मुंडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. एस. कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली

राष्ट्रीय सेवा योजना विशेष वार्षिक श्रमसंस्कार युवती शिबीराच्या कार्यक्रमानिमित्त ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष, मुख्याध्यापक श्री अरुण सुरवसे,



श्री गरिबे सर, सौ. सावरीकर मॅडम, प्रा. सुनील भोसले, डॉ.मनोज पाटील, डॉ. संग्राम टेकले, प्रा. भाऊसाहेब पुरी डॉ. विद्यादेवी कांबळे, डॉ. मुक्ता गंगथडे, प्रा. अलका शिंदे, प्रा.प्रशांत खटके, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. रुपाली कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे आपल्या व्याख्यानामध्ये डॉ., मकरंद गिरी म्हणाले की,

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानववाद हा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, समाज आणि व्यक्ती स्वतंत्र नसून ते एकात्म आहेत. मानवतावादाचा विचार हा केवळ भौतिक सुखावर नसून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारही पुरुषार्थांच्या समतोल साधनेवर आधारित आहे.

अंत्योदय म्हणजेच शेवटच्या माणसाचा विचार त्यांच्या विचारसरणीचा गाभा अंत्योदय हा होता, ज्याचा अर्थ समाजातील शेवटच्या स्तरावर असलेल्या शेवटच्या माणसाचा विकास होय. त्यांचे साधे राहणीमान आणि उच्च विचारसरणीचे प्रतीक होते. त्यांचे विचार आजही भारतीय राजकारणात, विशेषतः सामाजिक कल्याणाच्या योजनांमध्ये जसे प्रधानमंत्री आवास योजना, आरोग्य योजना यामध्ये मार्गदर्शक मानले जातात, जे एकात्म मानववादाच्या तत्त्वावर आधारित आहेत.एकूणच,

पंडित दीनदयाळ उपाध्याय हे केवळ राजकारणी नव्हते, तर एक महान समाज सुधारक आणि मानवतावादी विचारवंत होते, ज्यांनी भारताला भारतीय संस्कृतीवर आधारित एकात्म मानववादाचा विचार दिला त्यांच्या अंत्योदय विचारांचे महत्त्व आजही टिकून आहे असे मौलिक मार्गदर्शन डॉ. मकरंद गिरी यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शामराव शेंडगे यांनी तर अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक श्री अरुण सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर देशमुख तर आभार डॉ. प्रणिता पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. मारुती घाडगे, प्रा.नागनाथ पांचाळ,प्रा. शहाजी आरण, डॉ.पांडुरंग देशमुख, डॉ शंकर कोळगिरे, प्रा. दत्ता पवार, प्रा. रहीम शेख, प्रा. तानाजी बडे यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमासाठी स्वयंसेवक विद्यार्थिनी,शाळेतील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.

### दयानंद विधी महाविद्यालयात आज मानसिक आरोग्यावर राष्ट्रीय परिसंवाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० जानेवारी :** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथील महिला अध्ययन केंद्राच्या वतीने ''हॉलिस्टिक अप्रोच टू मेंटल वेलनेस'' या विषयावर शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय स्तरावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.आजच्या धकाधकीच्या, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक ताण, अस्वस्थता, नैराश्य व भावनिक थकवा वाढत असून मानसिक स्वास्थ्य जपणे ही काळाची गरज बनली आहे. शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य महत्त्वाचे असून ते समग्र दृष्टीकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर मानसिक आरोग्याविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे व मानसिक स्वास्थ्याकडे सर्वांगीण दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित करणे हा या परिसंवादाचा मुख्य उद्देश आहे.या परिसंवादात प्रा. डॉ मीत शिंदे, प्राध्यापक पी. एन. दोशी कॉलेज, मुंबई, तसेच डॉ. उज्ज्वल अनिल नेने, मानसोपचारतज्ज्ञ, के. ई. एम. रुग्णालय, पुणे, हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादात मानसिक आरोग्याशी संबंधित सामाजिक, मानसिक व कायदेशीर पैलूंवर तज्ज्ञांकडून सखोल विचार मांडले जाणार आहेत.या राष्ट्रीय परिसंवादाचा लाभ संशोधक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.


### चालक पाहिजेत

लातूर शहर महानगरपालिका परिवहन सेवेतील शहर बस चालविण्यासाठी **श्रीवरी बिझनेस सर्व्हिस प्रा. लि. कंपनीतर्फे** चालकांची भरती करण्यात येत असून बस बॅच असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पद | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | चालक (Driver) | 10 वी पास - बॅच बिल्ला आवश्यक |

संपर्क : पहिला मजला, उद्योग भवन, लातूर | मो. : 9359394643